# १. भारतीय समाजाचा परिचय

१.१ प्राचीन आणि मध्ययुगीन भारत
१.२ वसाहतकालीन भारत
१.३ स्वातंत्र्योत्तर काळातील भारत

## प्रस्तावना

समाजशास्त्राचे विद्यार्थी या नात्याने तुम्ही हे मान्य कराल की समाजशास्त्राचा भर मानवी सामाजिक वर्तनाच्या संदर्भातील 'काय' 'कसे' आणि 'का' यांसारख्या प्रश्नांचा धांडोळा समजून घेण्यावर असतो. समाजशास्त्र हे भूतकाळ आणि वर्तमानकाळामध्ये मानवी वर्तनावर प्रभाव पाडणारी विविध कारणे, परिस्थिती, घटना आणि क्रिया यांचे आकलन करीत असते. आपण ज्या अनेक सामाजिक नातेसंबंधांमध्ये गुंतलेले असतो त्यानुसार आपले वर्तन आकार घेत असते. त्यामध्ये आपली विचारसरणी आणि कृती, प्राधान्यक्रम, आवडीनिवडी, पूर्वग्रह, श्रद्धा, आचार आणि दैनंदिन जीवनात आपण ज्यांचे अनुसरण करतो असे धार्मिक विधी यांसारख्या अनेक गोष्टींचा समावेश आहे. उदाहरणार्थ, तुम्ही ज्या कुटुंबामध्ये मोठे झालात त्या कुटुंबामध्ये सकाळी पूजाअर्चा करण्याअगोदर स्नान करण्याची शिस्त असेल तर तुम्ही ती शिस्त मोडत नाही. तसेच तुम्ही या शिस्तीचा प्रचार इतरांपुढे करण्याची शक्यताही मोठ्या प्रमाणावर असते. आपण दुसरे उदाहरण घेऊया. पुरुष किंवा स्त्री यांपैकी कुणा एकालाच श्रेष्ठ मानण्याकडे तुमचा कल असेल तर त्यानुसार तयार झालेल्या तुमच्याच दृष्टिकोनाचा तुम्ही आग्रह धरता.

भारतीय संस्कृतीचा उगम हजारो वर्षांपूर्वीचा आहे. त्याकाळी 'समाजशास्त्र' नावाची स्वतंत्र ज्ञानशाखा अस्तित्वात आलेली नव्हती. तुम्हांला हे माहीतच आहे की, समाजशास्त्र १९व्या शतकाच्या मध्यावधीस युरोपमध्ये उदयाला आले. साहजिकच, "प्राचीन काळातील समाजजीवन आपल्याला कशाच्या आधारे समजते?" असा प्रश्न तुम्हाला पडणे बरोबरच आहे. प्राचीन काळातील समाजजीवन समजून घेण्याचा प्रमुख स्रोत म्हणजे पुरातत्त्वज्ञ आणि इतिहास संशोधकांनी शोधून काढलेल्या 'पुरातनवस्तू'. त्याखेरीज प्रवासवर्णने, एखाद्या घटनेच्या प्रत्यक्षदर्शींनी केलेल्या नोंदी, चरित्रग्रंथ, साहित्य, कोरलेल्या किंवा लिखित राजाज्ञा, दरबारी दप्तरे, यांसारखे लिखित पुरावे उपलब्ध असतात. पुरातनवस्तू म्हणजे प्राचीन संस्कृतीची ओळख पटवून देणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण मानवनिर्मित वस्तू. उदाहरणार्थ, हत्यारे आणि अवजारे, भांडी, दागिने, कलावस्तू, शिल्पे, उत्खनित वस्तू, चित्रे, दफनस्थळे आणि समाधीस्थळे, नाणी, शस्त्रास्त्रे इत्यादी. त्याखेरीज मानवी अस्थि आणि प्राण्यांची हाडे, जीवाश्म, प्राचीन स्थळांचे भौगोलिक स्थान या गोष्टीही प्राचीन काळातील समाजजीवन समजून घेण्यासाठी उपयुक्त असतात. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे या प्राचीन अवशेषांचे वय निश्चित करणे आणि इतर गुणधर्मांचे विश्लेषण करता येते. अशा पद्धतीने केलेल्या संशोधनातून प्राचीन समाजाचे पुनर्रचित चित्र उभे करता येते. त्यातून दिसणाऱ्या विविध पैलूंच्या आधारे आपले प्राचीन संस्कृतींविषयींचे आकलन स्पष्ट झालेले आहे.

एखाद्या हजारो वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचे वर्णन सारांशाने करणे, ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. तरीही भारतीय संस्कृतीच्या ज्या विशिष्ट पैलूंमुळे भारतीय लोकांची जडणघडण झाली, त्यांबद्दल खूप काही शिकता येणे शक्य आहे.

शिकण्याच्या सोयीसाठी पहिल्या पाठाचा मूळ घटक तीन उपघटकांमध्ये विभागला आहे.

(१) प्राचीन आणि मध्ययुगीन भारत
(२) वसाहतकालीन भारत
(३) स्वातंत्र्योत्तर काळातील भारत

२१ व्या शतकातील समाजशास्त्राचे विद्यार्थी या नात्याने पुढे दिलेल्या माहितीचे धागेदोरे तुम्ही व्यवस्थित समजून घ्याल, त्यांचे मनन कराल, त्यांचे मर्म जाणून घ्याल तसेच त्यांची चिकित्साही कराल, अशी अपेक्षा

आहे. अर्थातच हे करण्यासाठी ऐतिहासिक चौकटीतून उपलब्ध असलेल्या माहितीचा उपयोग करून काही हजार वर्षांचा भूतकाळातील प्रवास करणे अपरिहार्य आहे. त्यातून हाती लागलेल्या काही वैशिष्ट्यपूर्ण पैलू आणि महत्त्वपूर्ण टप्प्यांच्या आधारे मानवी जीवनपद्धतीचे असंख्य प्रकार सामाजिक-पर्यावरणीय हितसंबंध, आचारपद्धती, धार्मिक विधी, झालेले अन्याय, चुका, मानवी स्थलांतरे तसेच हे सर्व घडण्यासाठी आवश्यक असलेले घटक यांबद्दल तुम्हांला आश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाही. संमिश्र स्वरूपाच्या या माहितीच्या मंथनातून खूप काही हाती लागू शकते. आपली भूतकाळासंबंधीची जाणीव आपला वर्तमानकाळ घडवत असतो आणि त्यातूनच आपल्या विचारांची आणि वर्तणुकीची दिशा निश्चित होत असते, हे निःसंशय आहे. आपली जडणघडण कशी झाली आहे हे समजून घेत असताना जी नवी अंतर्दृष्टी तुम्हाला प्राप्त होईल त्याआधारे तुमचा उत्साह वाढेल. कारण तुम्हांला भूतकाळाकडून मिळालेला विविधांगी वारसा तसेच तुमचे वर्तमान आणि नजीकचा व दूरस्थ भविष्यकाळ या सर्वांची असंख्य पाळेमुळे किती खोलवर रुजलेली आहेत, याची कल्पना तुम्हांला येईल.

समाजशास्त्राच्या या वर्षीच्या अभ्यासक्रमात काही निवडक, वैशिष्ट्यपूर्ण पैलूंच्या आधारे आपण प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील भारतीय समाज कसा होता, हे जाणून घेणार आहोत. त्यामध्ये खालील सूत्ररूप गोष्टींचा समावेश आहे.

**(i) धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार**

**(ii) स्त्रियांचे समाजातील स्थान**

**(iii) शिक्षणपद्धती**

**(iv) समाजजीवन**

**(v) नागरीकरण**

या सूत्ररूप गोष्टींचा संक्षिप्त परिचय पुढे करून दिला आहे.

**(i) धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार :** अभ्यासकांच्या मते सध्या उपलब्ध असलेल्या धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचारासंबंधींचे साहित्य हे बहुस्तरीय आणि गुंतागुंतीचे आहे. हडप्पा संस्कृतीच्या उत्खननांमधून मातीच्या विविध पुरुष आणि स्त्रीमूर्ती मिळालेल्या आहेत. त्या देवतांच्या मूर्ती आहेत, असे सर्वसाधारणपणे समजले जाते. परंतु तत्कालीन देवालये किंवा मूर्तीपूजा


| हडप्पा संस्कृती | वेदकालीन भारत | दुसरे नागरीकरण | अभिजात काळ | मध्ययुगीन भारत |
|---|---|---|---|---|
| इ.स.पू. २६००-१५०० | इ.स.पू. १५००-५०० | इ.स.पू. ५००-२०० | इ.स.पू. २००- इ.स. ६५० | इ.स. ६५०-१५०० |

## १.१ प्राचीन आणि मध्ययुगीन भारत

इथे दिलेल्या कालरेषेच्या आधारे भारताच्या प्राचीन इतिहासाचे विभाजन वेगवेगळ्या कालखंडात कसे केले जाते, याची साधारण कल्पना तुम्हांला येऊ शकेल. या कालरेषेत दर्शवलेली वर्षे ही अचूक नाहीत, तर साधारणपणे दर्शवलेली आहेत. तुमच्या शालेय विद्यार्थीदशेत या ऐतिहासिक कालखंडांचा आणि त्यातील इतिहासाचा अभ्यास तसेच त्यासंबंधीच्या चर्चा केल्याचे तुमच्या स्मरणात असेलच. मग समाजशास्त्राचे विद्यार्थी म्हणून आपण सामाजिक इतिहासाच्या वाचनातून नेमके काय समजून घेणार आहोत?

यांचा निश्चित पुरावा मिळालेला नाही. नंतरच्या वैदिक संस्कृतीमध्ये सूर्य, पर्जन्य, जल, वादळ अशा अनेक नैसर्गिक घटकांना देवतास्वरूप मानून त्यांची प्रार्थना केली जाई. कालांतराने इंद्र, अग्नी यांसारख्या देवांना महत्त्व प्राप्त झाले. स्थानिक अवैदिक समूहांच्या स्वतःच्या श्रद्धाप्रणाली होत्या. या श्रद्धाप्रणाली कोणत्याही विशिष्ट धर्माच्या नावाने ओळखल्या जात नव्हत्या किंवा त्यांचे काही धार्मिक ग्रंथही नव्हते. त्यामुळे त्यांच्या श्रद्धाप्रणालींची माहिती फक्त प्राचीन धर्मग्रंथांमधील संदर्भांच्या आधारे मध्ययुगीन नोंदींमधून आणि वसाहतकालीन समूहविशिष्ट वर्णनांच्या (Ethnography) आधारे मिळू शकते. मानववंशशास्त्रज्ञांनी

समूहविशिष्ट श्रद्धाप्रणालींचे वर्गीकरण भूतप्रेतांवरील श्रद्धा (animism), अमानवी पूर्वजांवरील श्रद्धा (totemism) यांसारख्या शीर्षकांखाली केले. त्यासंबंधीचे तपशीलवार वर्णन तुम्हांला पुढील पाठात वाचता येईल.



हडप्पा पुरातत्त्वीय उत्खनन स्थळ

**मानववंश शास्त्र** : युरोपीय नसलेल्या, विदेशी समाज आणि संस्कृतींच्या अभ्यासाची गरज निर्माण झाल्यामुळे वसाहतकाळामध्ये मानववंश शास्त्राचा उदय झाला. मानववंशशास्त्र हे भौतिक मानववंशशास्त्र व सामाजिक/सांस्कृतिक मानववंशशास्त्र अशा दोन विस्तृत शाखांमध्ये विभागले गेले.

वसाहतिक अभ्यासाचा भाग म्हणून मानववंशशास्त्राचे टीकाकार एडवर्ड सैद यांनी 'प्राच्यविद्याशाखेचा' अभ्यास केला.

हिंदू जीवनपद्धतीच्या संदर्भातील श्रद्धाप्रणाली आणि धार्मिक आचार यांची माहिती अनेक वैदिक ग्रंथातून मिळते. त्यातील काही लिखित स्वरूपातील आहेत तर काही मौखिक परंपरेने जपलेले आहेत. त्यामध्ये वेदसंहिता उपवेद, वेदांगे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि महाकाव्ये यांचा समावेश होतो. वैदिक संस्कृतीचा काळ 'पूर्व वैदिक' (इ.स.पू. सुमारे १५००ते १००० वर्षे) आणि 'उत्तर वैदिक' (इ.स.पू. सुमारे १००० ते ५०० वर्षे) अशा दोन कालखंडात विभागलेला आहे. कारण या दोन कालखंडांच्या दरम्यान अनेक बदल घडून आले. त्या बदलांची चर्चा ओघाओघात होईलच.

पुराणे आणि धर्मशास्त्रावरील ग्रंथांमधून हिंदूंच्या आचारपद्धतीचे आणि सामाजिक वर्तनाच्या नियमांचे वर्णन केलेले आहे. हे नियम 'कर्मसिद्धान्त' यावर आधारलेले आहेत. त्यालाच 'कार्यकारणपरंपरेचा सिद्धान्त' असेही म्हटले जाते. 'करावे तसे भरावे' ही म्हण तुम्हाला परिचित असेलच. जन्ममृत्यूच्या चक्रावर हिंदूंचा विश्वास असतो. त्यानुसार व्यक्तीच्या एका जन्मातील कर्मसंचित पुढील जन्माचा आलेख निश्चित करते. जीवात्मा हा मोक्षप्राप्ती होईपर्यंत 'पुन्हापुन्हा जन्म आणि पुन्हापुन्हा मृत्यू' या चक्रामध्ये अडकलेला असतो. हिंदू व्यक्तीच्या आयुष्यात चार पुरुषार्थ (उद्दिष्टे) महत्त्वाची मानलेली आहेतः

| धर्म | अर्थ |
|---|---|
| • फलाची आशा न धरता निरपेक्ष वृत्तीने विहित कर्मे करत राहणे | • विहित मार्गाने संपत्ती मिळवणे. |
| **काम** | **मोक्ष** |
| • विहित मार्गाने शारीरिक सुखांची आणि आनंदाची प्राप्ती करून घेणे. | • जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका मिळवण्याचे आयुष्यातील परमोच्च ध्येय. |

विविध अभ्यासक आणि संशोधक यांनी मांडलेल्या मतानुसार पूर्व वैदिक काळातील समाज हा व्यवसायाधिष्ठित सामाजिक वर्णपद्धतीच्या (या पद्धतीची चर्चा पुढे केली जाईल) बाबतीत ताठर नव्हता. मात्र काही काळाने वर्णपद्धतीत अधिकाधिक ताठर सीमा निर्माण झाल्या आणि जातिव्यवस्था निर्माण झाली आणि तिचे रुपांतर उच्चनीचतेच्या स्तरांमध्ये विभागलेल्या रचनेत झाले. पुरोहितवर्गाचे वर्चस्व असलेल्या आणि "पवित्र आणि अपवित्र" या कल्पनांवर आधारलेल्या जातिव्यवस्थेत स्तरांची ही उतरंड खोलवर रुजत गेली. याचा अर्थ जातीच्या अंतर्गत विवाहाची सक्ती, धार्मिक आचारविधींना प्रमाणाबाहेर महत्त्व आणि जातीजातींमधील सीमा अत्यंत कडक होत गेल्या.

या पार्श्वभूमीवर महावीर वर्धमान आणि गौतम बुद्ध यांनी वेदप्रामाण्याला आणि पुरोहितांच्या वर्चस्वाला विरोध करणाऱ्या नवीन तत्त्वज्ञानाची शिकवण लोकांना दिली. दोघांचा जन्म क्षत्रिय कुळांमध्ये झाला असला तरी त्यांनी यज्ञविधींना प्राप्त झालेले अत्याधिक महत्त्व आणि पशुबळीची प्रथा तसेच सामाजिक उतरंड या गोष्टींना विरोध केला. त्यांचे तत्त्वज्ञान भारतीय परंपरेत 'बौद्ध धर्म' आणि 'जैन धर्म' म्हणून रूढ झाले. जैन धर्माची परंपरा अत्यंत प्राचीन असल्याचे समजले जाते. जैन परंपरेत एकूण २४ तीर्थंकर होऊन गेले. वर्धमान हे चोविसावे तीर्थंकर होते. हिंदू परंपरेप्रमाणेच जैन परंपरेतही कर्मसिद्धान्ताला मान्यता आहे. मात्र 'अहिंसा' आणि 'तपस' या दोन तत्त्वांना जैन जीवनपद्धतीत अत्यंत महत्त्व आहे. वर्धमान महावीरांनी त्यांच्या उपदेशात 'देव' या संकल्पनेचा समावेश केलेला नाही. त्यांनी 'निर्वाण' या तत्त्वावर भर दिला. त्यांनी लोकांना उपदेश करताना 'अर्धमागधी' या लोकभाषेचा उपयोग केला.

**जाणून घ्या**

जैन परंपरेमध्ये पूजनीय मानल्या जाणाऱ्या १६ स्त्रियांमधील द्रौपदी, कौसल्या, सीता, कुंती आणि दमयंती यांना हिंदू परंपरेमध्येही महत्त्वाचे स्थान आहे.

वैदिक परंपरेत यज्ञविधी आणि पशुबळी यांना तर जैन परंपरेत व्रतस्थ जीवनपद्धतीच्या दैनंदिन नियमांना महत्त्व देण्यात आले.

गौतम बुद्धांनी 'चार आर्यसत्ये' आणि 'अष्टांगमार्गा' वर आधारित 'मध्यममार्गा'चा उपदेश केला.

जैन परंपरेप्रमाणेच गौतम बुद्धांनाही 'देव' ही संकल्पना मान्य नव्हती. 'तिपिटक' (त्रिपिटक) हे बौद्ध धर्माचे पवित्र ग्रंथ 'पाली' या लोकभाषेत लिहिलेले आहेत. गौतम बुद्धांनी 'भिक्खूसंघ' स्थापन केला आणि भिक्खूसंघाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले. व्यक्तिगत आणि सामाजिक पुनरुत्थानासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी निर्माण करणे, हे भिक्खू आणि भिक्खूसंघाचे महत्त्वाचे कार्य होते.

**जाणून घ्या**

भारतीय तत्त्वज्ञानातील षड्दर्शनांपैकी जैन आणि बौद्ध दर्शने यांना 'नास्तिक' असे (म्हणजे ईश्वराचे अस्तित्व अमान्य करणारी) म्हटले जाते. उरलेल्या दर्शनांमधील 'चार्वाक दर्शन' तसेच 'आजीविका' या पंथाचा अपवाद वगळता भारतीय दर्शने आणि पंथ 'आस्तिक' (म्हणजे ईश्वराचे अस्तित्व मान्य करणारी) आहेत.

चार्वाक दर्शन आणि आजीविका पंथ हेही भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेचा भाग आहेत. चार्वाकाचे तत्त्वज्ञान हे अनिश्वरवादी आणि ऐहिक विचारसरणीच्या पायावर उभारलेले आहे. आजीवक पंथाचा उगम दैववाद आणि तापसी जीवनपद्धती यातून झालेला आहे.

**तुम्हाला माहीत आहे का?**

जातक कथा (इ.स.पू.३०० ते इ.स.४००) जातक कथासाहित्याचा विस्तार मोठा आहे. त्यामध्ये गौतम बुद्धांच्या मानवीरूपातील आणि प्राणीरूपातील पूर्वजन्मांच्या कथांचा समावेश आहे. भविष्यातील बुद्धांचा जन्म राजा, जातीबाहेरील व्यक्ती किंवा हत्ती अशा कोणत्याही रूपात असू शकेल. कोणत्याही स्वरूपात बुद्धांनी जन्म घेतला तरी त्यांच्यातील काही लक्षणे आणि त्यांची नैतिकता यांवरून बुद्धांची ओळख जातककथांमधून पटते.

या कथांमध्ये विविध प्रकारची अनेक पात्रे एकमेकांशी संबंधित असतात. ती पात्रे वेगवेगळ्या संकटात सापडतात आणि बुद्ध स्वतः त्यांच्या समस्या दूर करतात. जीवसृष्टीतील नैसर्गिकतेचा संदर्भ हा या कथांचा अनिवार्य भाग आहे.

जैन आणि बौद्ध धर्मांकडे प्रस्थापित धर्माला विरोध करणारे बंडखोर धर्म म्हणून पाहिले जाते. या दोन्ही धर्मांनी समाजाच्या सर्व थरांमधील व्यक्तींना प्रवेश दिला. त्यामुळे मोक्षाचा हक्क समाजातील विशिष्ट

वर्गापुरताच मर्यादित राहिला नाही. जैन धर्माच्या तुलनेत बौद्ध धर्मामधील नियम हे सौम्य होते. त्यामुळे बौद्ध धर्माकडे लोक मोठ्या संख्येने आकृष्ट झाले, हे समजण्यासारखे आहे. बौद्ध धर्माचा प्रसार दूरवर झाला. मौर्य सम्राट अशोकाच्या आश्रयामुळे त्याचा प्रसार भारताच्या सीमा ओलांडून तिबेट, चीन, मंगोलिया, म्यानमार, जावा, सुमात्रा, श्रीलंका अशा बाहेरील अनेक प्रदेशांमध्ये झाला. आजही या प्रदेशांमधील लोकांच्या दृष्टीने भारत ही त्यांच्या धर्माच्या उगमाची भूमी म्हणून पवित्र आहे. ज्या व्यक्तींनी बौद्ध भिक्खू आणि भिक्खूणीची दीक्षा स्वीकारली त्यांच्यासाठी बौद्ध संघांची स्थापना करण्यात आली.

बौद्ध धर्मामध्ये व्यक्तीच्या नैतिक उन्नतीला आणि त्यावर आधारित जीवनपद्धतीला महत्वाचे स्थान देण्यात आले. त्यामध्ये दानवृत्ती, स्वार्थत्याग, संयम, विचार आणि कृतीमधील अहिंसा या गुणांनी युक्त अशा आचरणावर भर देण्यात आला. उपनिषदांमध्येही या गुणांवर भर दिलेला आहे. हे गुण बौद्ध जीवनपद्धतीत मोठ्या प्रमाणात आचरणात आणले जातात.

कालांतराने जैन आणि बौद्ध या दोन्ही धर्मांमध्ये स्वतंत्र पंथ निर्माण झाले. बौद्ध धर्मातील 'हीनयान' (छोटे वाहन) पंथामधील अनुयायी मूळ नियमांचे पालन काटेकोरपणे करत असल्यामुळे त्यांची संख्या 'महायान' (मोठे वाहन) पंथाच्या अनुयायांच्या तुलनेने कमी होती. महायान पंथाचे नियम हे अधिक व्यवहार्य आणि सहज आचरता येण्याजोगे होते. त्यामुळे त्या पंथातील अनुयायांची संख्या अधिक होती. जैन धर्मामध्ये 'दिगंबर' (आकाश हेच वस्त्र असे मानणारे मुनी ज्या पंथात आहेत) आणि श्वेतांबर (श्वेत वस्त्र परिधान करणारे मुनी ज्या पंथात आहेत) असे दोन पंथ निर्माण झाले. बौद्ध धर्माचा तिसरा पंथ वज्रयान हा पुढे इसवीसनाच्या ८व्या शतकात उदयाला आला.

**कृती १**

बौद्ध धर्मातील 'अष्टांगमार्गा'ची माहिती गोळा करा.

वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांच्या निर्वाणानंतर काही काळाने त्यांच्या उपदेशाचा प्रसार कमी झाला. पुढे सुमारे बाराशे वर्षांच्या कालखंडात कोणताच नवीन आणि प्रभावी धर्म उदयाला आला नाही. इतिहासकार आर.एस. शर्मा यांच्या मते, हा कालखंड अनेक घडामोडींमुळे होणाऱ्या सततच्या सामाजिक विघटनाचा आणि विकेंद्रीकरणाचा होता.

**आता आपण मध्ययुगीन कालखंडातील** (इ.स. सुमारे ६०० ते १५००) महत्वाच्या धार्मिक आचार आणि श्रद्धाप्रणालींची माहिती घेऊया. या कालखंडात भारतामध्ये काही धर्म बाहेरून आले. त्यामध्ये ज्युडाइझम, ख्रिश्चन, इस्लाम आणि कालांतराने आलेल्या पारशी धर्मांचा समावेश होतो.

**संघम कालखंड** (इ.स.पू.६ वे शतक ते इ.स.३ रे शतक) हा दक्षिण भारतातील (म्हणजे साधारणपणे आजचे तमिळनाडू आणि केरळ या राज्यांचा प्रदेश) प्राचीन इतिहासाचा काळ आहे. या काळाला प्राचीन तमिळ कवी आणि साहित्यिकांच्या मदुराईतील संघमांमुळे (परिषदा) 'संघम कालखंड' असे म्हटले जाते. या कालखंडात समाजावरील धर्माचा पगडा फार तीव्र नव्हता. लोकांचे धार्मिक आचरण विविध प्रकारचे विधी आणि भक्ती या दोन्हींवर आधारलेले होते. धार्मिक विधी भूतप्रेतादी आणि तत्सम स्वरूपाच्या देवतांच्या उपासनेशी संबंधित होते. तसेच वृक्ष, दगड, जल, प्राणी, तारे आणि ग्रह यांनाही देवतास्वरूप मानून त्यांची पूजा केली जाई. संघम काळातील लोकांना काही आध्यात्मिक आणि तात्त्विक सत्यांची जाणीव होती. जीवरूपी चैतन्य हे शरीराहून भिन्न असते, असे ते समजत असत. त्यानुसार चैतन्यरूपी जीवाचे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व असते, परंतु त्याच्याखेरीज असलेल्या शरीराला अस्तित्व नसते. संघमकालीन लोकांचे पूर्वजपूजा, पुनर्जन्म यांसारख्या गोष्टींभोवती गुंफले गेलेले तत्त्वज्ञान मृत्यू आणि मृत्यूनंतरचे जीवन यांचा विचार करणारे होते.

काही अभ्यासकांच्या मते, पारशी धर्माचा उगम वैदिक काळाच्याही पूर्वीचा आहे. या धर्माचे मूळ मध्य पूर्वेच्या प्रदेशात आहे. या धर्माच्या अनुयायांचा धार्मिक छळ होत होता म्हणून त्यांनी स्थलांतर केले आणि ते भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर गुजरातमध्ये पोचले. ते तेथेच स्थिरावले. तेथील संस्कृतीत मिसळले. बाहेरून

आलेल्या लोकांमध्ये फक्त पारशी समाजाचे लोक असे आहेत की जे अजूनही त्यांच्या समाजाबाहेरच्या व्यक्तीशी सहसा लग्न करत नाहीत. पारशी धर्म बाहेरील व्यक्तींना आपल्या धर्मात घेण्यास परवानगी देत नाही. तसेच त्यांच्या अग्यारीत पारशी व्यक्तींखेरीज इतरांना प्रवेश करण्यास बंदी असते.

बाहेरून भारतात आलेल्या धर्मांच्या अनुयायांपैकी ज्यूधर्मीय लोक हे सर्वप्रथम होत, असे मानले जाते. ते हिब्रू राजा सॉलोमन याच्याबरोबर व्यापारासाठी भारतात आले. कोचीमधील ज्या लोकांनी ज्यू धर्माचा स्वीकार केला, त्यांना ‘कोची ज्यू’ असे नाव मिळाले. कोचीच्या किल्ल्यामध्ये आजही ज्यू सिनॅगॉग पहायला मिळते. भारतातील ज्यू समाजाची लोकसंख्या कमी झाली आहे. ‘बेने इस्रायल ज्यू’ या समाजाचे काही लोक मुंबईमध्ये आणि मिझोराम या राज्यात आहेत. ज्यूधर्मीय लोक ‘तोरॉ’ या धर्मग्रंथातील नियमांचे पालन करतात. (तोरॉमध्ये बायबलच्या ‘जुना करार’ या ग्रंथाचा समावेश आहे.) ज्यू धर्म हा एकेश्वरवादी आहे. पृथ्वीतलावर देवाच्या प्रेषिताचे आगमन अजून व्हायचे आहे अशी ज्यू धर्मीयांची श्रद्धा आहे. ‘शबाथ’ हा त्यांच्यासाठी एक पवित्र विधी आहे. मानवी इतिहासामध्ये ज्यू समाजातील लोकांचा अनन्वित छळ केला गेला, हे तुम्हाला माहीत असेलच.

**पारशी धर्म** : हा जगातील प्राचीन धर्मांपैकी एक आणि आजतागायत टिकून राहिलेला धर्म आहे. चांगले आणि वाईट अशा ध्रुवीय संकल्पना या धर्माच्या मध्यवर्ती आहेत (उदाहरणार्थ, स्वर्ग आणि नरक) ‘अवेस्ता’ हा या धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. त्यामध्ये ‘अहुर मज्द’ हा विश्वाचा निर्माता असून ‘आशा’ म्हणजे वैश्विक सत्याचा उगम त्याच्यापासून होतो, असे म्हटलेले आहे. अग्नी आणि जल ही दोन तत्त्वे ‘शुद्‌धते’ची माध्यमे आहेत. ‘अग्यारी’ म्हणजे अग्निमंदिर हे पारशी धर्माचे पूजास्थान असते. इराणहून गुजरातमधील नवसारी येथे येताना पारशी पुरोहितांनी स्वतःबरोबर पवित्र अग्नी आणला (इ.स. ९ वे शतक).

स्वतःची मूळ सांस्कृतिक ओळख हरवू न देता, संख्याबळ उत्तरोत्तर कमी होत असतानाही, पारशी समाजाने भारतीय जनजीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. दादाभाई नौरोजी, फिरोजशाह मेहता, फिल्ड मार्शल सॅम मानेकशॉ, झुबीन मेहता ही पारशी समाजातील काही प्रसिद्‌ध व्यक्तिमत्वे आहेत. तसेच भारतातील आधुनिक उद्योगांची उभारणी करण्यात टाटा, गोदरेज आणि वाडिया या पारशी कुटुंबांची कामगिरी फार मोलाची आहे. भारताला आण्विक सत्ता म्हणून ओळख मिळवून देण्यात डॉ. होमी भाभा यांचा सहभाग महत्त्वाचा होता. नानी पालखीवाला, सोली सोराबजी आणि फली नरिमान यांच्यासारख्या सुप्रसिद्‌ध कायदेपंडितांनी भारतीय समाजाला कायद्याची ओळख करून दिली.



**ज्यू सिनॅगॉग, कोची**

## हे माहीत करून घ्या

**वंशविच्छेदाची भट्टी :** इ.स.१९४५ पासून 'होलोकॉस्ट' या इंग्रजी शब्दाला एक भयानक परिमाण प्राप्त झाले आहे. हा शब्द युरोपमधील लाखो ज्यू तसेच जिप्सी, समलैंगिक, समाजवादी, साम्यवादी आणि इतर लोकांना जिवंत जाळण्यात आले त्या घटनेचा निर्देश करण्यासाठी वापरला जातो. दुसऱ्या जागतिक महायुद्धात नाझी राजवटीने हे घडवले. भट्टीत जिवंत जाळण्यात आलेल्यांची संख्या सुमारे ११ दशलक्षाच्या जवळपासची असल्याचा अंदाज आहे.

दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळात युरोपमध्ये प्रस्थापित केल्या गेलेल्या छळ छावण्यांची अधिक माहिती मिळवा.

१९४८ ते १९५१ या काळात सुमारे १ लाख ३६ हजार विस्थापित ज्यू लोकांनी इझ्रायल येथे स्थलांतर केले. अनेकजण अमेरिका आणि युरोपबाहेरील देशांमध्ये स्थिर झाले.

अनेक शतके ज्यू लोकांना त्यांची स्वतःची भूमी नव्हती आणि त्यामुळे ते वेगवेगळ्या खंडांमध्ये विखुरले होते. त्यांना स्वतःची म्हणून म्हणण्याजोगी भूमी स्वतःचा देश 'इझ्रायल' मिळण्यासाठी २० वे शतक उजाडावे लागले. त्यासाठी त्यांना राजकीय संघर्ष करावा लागला.

इसवीसनाच्या पहिल्या शतकात येशू ख्रिस्त यांचे शिष्य सेंट थॉमस हे त्यांच्यासोबत दक्षिण भारतातील मलबारच्या किनाऱ्यावर ख्रिश्चन धर्म घेऊन आले. येशू ख्रिस्तांच्या अनुयायांना 'ख्रिश्चन' म्हणून ओळखण्यात येऊ लागले. सेंट थॉमस यांच्या मलबारमधील स्थानिक अनुयायांना 'सिरियन ख्रिश्चन' म्हटले जाऊ लागले. ख्रिश्चन धर्मही ज्यू धर्माप्रमाणे एकेश्वरवादी आहे आणि त्यांचा जीवनाबद्दलचा दृष्टिकोन एकरेषीय आहे. म्हणजे प्रत्येकाला एकच जन्म मिळतो आणि त्या जन्मातील त्यांच्या वर्तणुकीच्या आधारे त्यांना स्वर्गात प्रवेश मिळेल की नाही याचा निवाडा केला जातो, हा विचार त्यांच्या श्रद्धाप्रणालीच्या मुळाशी असतो. 'प्रेम' हे ख्रिश्चन धर्माचे पायाभूत तत्त्व आहे आणि सर्व ख्रिश्चन धर्मियांच्या मनात प्रेषित येशू ख्रिस्तांचा मृत्यू आणि पुनरुत्थान यांबद्दल विश्वास असतो. वसाहतवादी काळात ख्रिश्चन धर्माचा भारतामध्ये लक्षणीय प्रभाव होता.



**पलयूर येथील सिरोमलबार चर्चमध्ये सेंट थॉमस यांनी प्रतिष्ठापित केलेला क्रूस**

भारतामध्ये इस्लामचे आगमन इसवीसनाच्या ६ व्या शतकात झाले असले तरी त्याचा प्रभाव ठळकपणे दृश्यमान होण्यास बराच अवधी जावा लागला. ज्यू आणि ख्रिश्चन या धर्मांप्रमाणेच इस्लाम हा धर्मही एकेश्वरवादी आहे आणि 'पवित्र कुराण' हा ग्रंथ इस्लामच्या श्रद्धाप्रणालीचा स्रोत आहे.

| दृढ श्रद्धेची कबुली | नमाज पढणे | दान देणे | रमझानच्या पवित्र महिन्यात उपवास करणे | मक्केची यात्रा करणे |
|---|---|---|---|---|
| शहाद (कलमा) | सलात | जकात | सौम (रोजा) | हज |

मध्ययुगामध्ये इस्लामचा प्रसार दूरवर झाला. अनेक मुस्लीम सत्ताधीशांनी इस्लामचा प्रसार करण्याचे कार्य केले. दिल्लीच्या इस्लामिक सत्तांनी एक मोठे साम्राज्य उभे केले आणि ५ मुस्लीम राजघराण्यांनी दिल्लीमधून सुमारे ३२० वर्षे राज्य केले.


मामलूक घराणे किंवा स्लेव घराणे → खिलजी घराणे → तुघलक घराणे → सय्यद घराणे → लोदी घराणे

अकबर बादशहाने इसवी सन १५७९ मध्ये नैतिक तर्कवादाच्या आधारावर 'दिन-ई-इलाही' या नवीन धर्माची स्थापना केली. तसेच सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानाचे मंथन करून त्यातून पुढे आलेल्या 'वैश्विक सहिष्णुता'

या तत्वाच्या आधारावर अकबर बादशहाने या धर्माची उभारणी केलेली होती. या धर्मपद्धतीमध्ये पुरोहित-धर्मगुरू, धार्मिक विधी, श्रद्धाप्रणाली आणि धर्मग्रंथ यांपैकी काही नव्हते. विविध पवित्र ग्रंथांतील शिकवणीचे सार या धर्मामध्ये होते.

ख्रिश्चन, मुस्लीम आणि ज्यू अशा विविध धर्माच्या लोकांशी स्थानिकांच्या आलेल्या सामाजिक संबंधातून धर्मांतरे झाली. ख्रिश्चन धर्मप्रचारक त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक सेवेसाठी ओळखले जातात. या सेवा देत असताना त्यांनी लिंग, जात, धर्म, समाज असा भेदभाव केला नाही.

शीख धर्माचा उदय १५ व्या शतकामध्ये झाला. गुरू नानक (इ.स.१४६९-१५३९) यांनी शीख धर्माची स्थापना केली. त्याचा प्रसार सुरुवातीला पंजाबमध्ये झाला. या धर्मामध्ये जातीवर आधारित उच्चनीचतेला स्थान नव्हते. धर्म आणि इतर सामाजिक क्षेत्रात प्रत्येकाच्या समानतेला शीख धर्मामध्ये मान्यता होती. शीखांच्या दहा गुरूंनी केलेला उपदेश हा शीख धर्मियांच्या श्रद्धाप्रणालीचा पाया आहे. 'श्रीगुरूग्रंथसाहिब' हा त्यांचा पवित्र ग्रंथ आहे.




**शीख धर्मातील पंचकार**

सार्वजनिक स्वयंपाकघराला पंजाबी भाषेमध्ये 'लंगर' म्हणतात. १६ व्या शतकातील संस्थापक गुरूंनी लंगरला संस्थात्मक रूप दिले. लंगरचे संस्थात्मक स्वरूप हे दान आणि समानता या तत्वांचे एकमेवाद्वितीय असे प्रतीक आहे. तिथे जातपात, वय, स्त्री-पुरुष, सामाजिक प्रतिष्ठा असा कोणताही भेदभाव न करता येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला शाकाहारी भोजन पुरवले जाते. सर्व शीख गुरूद्वारांमध्ये लंगर असते. तिथे काम करणाऱ्या स्वयंसेवकांना 'सेवादार' असे म्हटले जाते. अभ्यागतांशी त्यांची वर्तणूक सौजन्य, काळजी आणि अगत्य या तिन्ही गोष्टींनी युक्त अशी असते.



**लंगर**

भेदाभेदाच्या पार्श्वभूमीवर मध्ययुगीन कालखंडात भक्ती तत्वाला प्राधान्य देणाऱ्या चळवळी उदयाला आल्या. हिंदू धर्मपद्धतीत त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले. या बदलांमधून समाजाच्या सर्व जातिंमधील आणि स्तरांमधील लोकांना सामावून घेणारे भक्तीपंथ भारतातील विविध प्रदेशांमध्ये उदयाला आले. भक्तीपंथांमध्ये धार्मिक विधींच्या अतिरेकावर टीका केली गेली आणि साधेपणावर भर देण्यात आला. परमेश्वरापुढे सर्वजण समान असतात हे आग्रहाने मांडण्यात आले. कीर्तन आणि अखंड नामस्मरण यांना भक्तीपंथांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक संतकवींच्या कामगिरीमुळे भक्तीपरंपरेतील कीर्तन आणि अखंड नामस्मरण या दोन गोष्टी समाजाच्या सर्व स्तरांमध्ये कायमस्वरूपी रुजल्या. भक्तीतत्वावर भर देणारा इस्लाममधील सुफीपंथही याच काळात उदयाला आला. या पंथातही मानवतेची एकता आणि अल्लाहच्या दरबारातील सर्वांचे समान स्थान या तत्वांना महत्त्व होते. कबीर, रहीम आणि गुरू नानक यांसारख्या संतमहात्म्यांचे भारतभरच्या भक्ती चळवळीतील स्थान अनन्यसाधारण आहे. कबीर आणि रहीम यांनी विधी, अंधश्रद्धेवर आधारलेल्या प्रथा, मूर्तीपूजा आणि तीर्थयात्रा यांसारख्या धार्मिक बाह्योपचारांचा निषेध केला. गुरू नानक यांनी जातिव्यवस्था धार्मिक विधी आणि मूर्तीपूजा इत्यादींना मनाई केली.

**महाराष्ट्रातील भक्तीचळवळ :** महाराष्ट्रामध्ये भक्तीचळवळीचा उगम इसवीसनाच्या १३ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांच्या काळात झाला. पंढरपूरचा विठोबा हे दैवत या चळवळीचा केंद्रबिंदू होते. संत नामदेव (इ.स. १२७०–१३५०) हे संत ज्ञानेश्वरांचे समकालीन होते. त्यांनी उपवास तीर्थयात्रा आणि इतर सर्व प्रकारच्या धार्मिक बाह्योपचारांवर टीका केली.



**(ii) भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान :** भारतीय वैदिक साहित्य आणि इतिहास संशोधनाच्या आधारे असे दिसते की पूर्व वैदिक काळातील स्त्रियांचे सामाजिक स्थान तुलनेने अधिक उच्च दर्जाचे होते. परंतु त्यांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा होता असे मात्र म्हणता येणार नाही. त्या काळी पितृप्रधान समाजव्यवस्था होती आणि आजही ती तशीच आहे.

पूर्व वैदिक काळातील स्त्रियांना वेदांचे शिक्षण घेण्याची मुभा होती. त्यांना उपनयन संस्काराचा अधिकार होता. त्यामुळे त्यांना गुरूगृही राहून शिक्षण घेता येत असे. ऋग्वेदामध्ये वेदविद्या प्राप्त केलेल्या स्त्रियांना अत्यंत मानाचे स्थान होते. अशा स्त्रियांचे दोन प्रकार ऋग्वेदात सांगितलेले आहेत : 'सद्यवधू' म्हणजे उपनयनाचा संस्कार पूर्ण होताच गुरूगृही न जाता विवाह होऊन सासरी पाठवल्या गेलेल्या मुली. 'ब्रह्मवादिनी' म्हणजे उपनयनाचा संस्कार प्राप्त झाल्यानंतर वेदांचे शिक्षण घेऊन वेदविद्येत पारंगत झालेल्या स्त्रिया. त्या आजन्म अविवाहीत राहून वेदांचे अध्ययन आणि अध्यापन करत असत. स्त्रियांना वेद आणि वेदांच्या स्पष्टीकरणाशी निगडित असलेली वेदांगे या दोन्हींचे शिक्षण दिले जात असे. नंतर मात्र स्त्रियांचे शिक्षण फक्त धार्मिक स्तवने आणि कविता यांच्यापुरते मर्यादित झाले. वेद आणि उपनिषदांचे ज्ञान प्राप्त केलेल्या स्त्रियांमध्ये अपाला, घोषा, लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी अशा काही पंडिता विशेष नावाजलेल्या होत्या तत्कालीन समाजामध्ये स्त्रियांची भूमिका समाजोपयोगी आणि अर्थोत्पादक समजली जात होती. त्यांना 'विदथ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सामाजिक सभांमध्ये सहभागी होता येत असे. त्यांना आयुष्याचा जोडीदार स्वतः निवडण्याची मुभा होती. 'विवाह' हा एक पवित्र संस्कार मानला जाई आणि तो मोडण्यास मान्यता नव्हती. मात्र स्त्रीने विवाह केलाच पाहिजे अशी सक्ती नव्हती. एकपत्नीत्वाला प्राधान्य होते. उपनिषदांमध्ये 'अनुलोम विवाह' म्हणजे उच्च वर्णाच्या वराचा कनिष्ठ दर्जाच्या वर्णातील वधूशी विवाह आणि 'प्रतिलोम विवाह' म्हणजे उच्च वर्णातील वधूचा कनिष्ठ वर्णातील वराशी विवाह, या प्रकारांचा उल्लेख आढळतो.

उत्तर वैदिक काळात जातिव्यवस्था आणि पुरोहितवर्गाचे वर्चस्व समाजामध्ये खोलवर रूजले. काळाबरोबर जातीजातींमधील भेद अधिक कडक होत गेले. जातिव्यवस्थेतील विषमता वाढत गेली. या घडामोडींमध्ये स्त्रियांचा दर्जा अधिकच खालावत गेला. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेल्यामुळे त्यांचा उपनयनाचा आणि गुरुकुलात राहून शिकण्याचा अधिकारही संपुष्टात आला. 'विवाह' हा एकमेव संस्कार आणि बालवयातील विवाह हेच स्त्रियांचे वास्तव ठरले.

आतापर्यंत तुम्ही याची नोंद घेतलेली असेल की पूर्व वैदिक काळात सामाजिक आणि कायदेशीर हक्कांच्या दृष्टीने स्त्रियांचे स्थान उत्तर वैदिक काळाशी तुलना केली असता अधिक मानाचे होते परंतु तेव्हाही ते पुरुषांच्या बरोबरीचे नव्हतेच. स्थावर संपत्तीवर त्यांना अधिकार नव्हता. उत्तर वैदिक काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा घसरत गेला. स्त्रिया फक्त घरगुती कर्तव्यांशी बांधल्या गेल्या आणि सामाजिक सभांमधून त्यांनी सहभागी होणे वर्ज्य करण्यात आले. स्त्रियांचा कुटुंबातील दर्जा गौण ठरला. कुटुंबपद्धती पितृप्रधान असणे आणि संपत्तीचा आणि वंशावळीचा वारसा हा पित्याकडून पुत्राकडे जाणे ही पूर्वापार प्रथा आणखी खोलवर रूजली. त्यामुळे स्त्रियांनी जन्मापासून विवाहापर्यंत पित्याच्या, विवाहापासून पतीच्या मृत्यूपर्यंत पतीच्या आणि पतीच्या मृत्यूनंतर पुत्राच्या आज्ञेत रहावे, असा दंडक घातला गेला. मुलीचा जन्म ही घटना अवांच्छित मानली जाऊ लागली. तसेच हुंडापद्धती

सुरू झाल्याचे दिसते. ‘गौतम धर्मसूत्र’ या ग्रंथात मुलीचे कौमार्य आणि पावित्र्य भंग होऊ नये म्हणून तिचा विवाह तिला ऋतुप्राप्ती होण्याअगोदर करावा, असे म्हटलेले आहे.

**कृती २**

आधुनिक भारतीय स्त्रिया आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रिया यांच्या सामाजिक स्थानामध्ये काही साम्य आहे का याची चर्चा करा. त्या संदर्भातील काही प्रथा-परंपरा २१ व्या शतकात अजूनही टिकून आहेत का?

जैन धर्म हा धार्मिक समतेच्या तत्त्वावर आधारलेला असल्यामुळे त्यामध्ये सर्व जीवांचे हक्क गृहीत धरलेले आहेत. त्यामुळे स्त्रियांनाही निर्वाणप्राप्ती होऊ शकते, हे या धर्मात मान्य केलेले आहे. मात्र दिगंबर आणि श्वेतांबर पंथांमधील मुनी आणि साध्वी यांच्या संदर्भात विचार करता स्त्री-पुरुषांच्या आध्यात्मिक अधिकारात फरक असल्याचे आढळते. श्वेतांबर पंथामध्ये अनेक आदरणीय स्त्रियांच्या कामगिरीची दखल घेतलेली आहे. जैन धर्मातील ‘सोळा सती’ या सर्व स्त्रियांसाठी आदर्शवत आणि अनुकरणीय मानलेल्या आहेत. मात्र जैन संघातील साध्वींसाठी असलेले आचरणाचे नियम हे मुनींसाठी असलेल्या नियमांपेक्षा निराळे असतात. असे असले तरी तीर्थंकरांच्या मातांना देवतास्वरूप मानून संतती, संपत्ती आणि आरोग्य यांसारख्या इच्छांच्या पूर्तीसाठी त्यांची पूजा केली जाते. अनेक जैन साध्वींनी सतीप्रथा, दासीप्रथा आणि पशुबळीची पद्धत यांसारख्या गोष्टी संपुष्टात आणण्यासाठी योगदान दिले आहे. जैन साहित्य आणि मौखिक परंपरा यांमधून अनेक साध्वी आणि आदर्श स्त्रियांचे गुणगान केलेले आढळते.

दिगंबर जैन वस्त्रविहीनता ही निर्वाणाच्या मार्गावरील मूलभूत गोष्ट आहे, असे मानतात. वर्धमान महावीरांनी स्वतः या गोष्टीचा पुरस्कार केला होता.

गौतम बुद्धांनी स्त्रियांना बौद्ध संघामध्ये प्रवेश देण्यास आणि त्यांना तेथील कार्यात पूर्णपणे सहभागी होण्यास मान्यता दिली. बौद्ध धर्मातील विविध पंथ आणि परंपरा यांच्यामध्ये स्त्रियांच्या आध्यात्मिक उन्नतीच्या बाबतीतील शक्यतांच्या संदर्भात भिन्न भिन्न दृष्टिकोन आहेत. विशेष म्हणजे स्त्रिया आणि पुरुष यांच्यामध्ये आध्यात्मिक उन्नतीची समान क्षमता असते आणि त्यामुळे अनेक स्त्रियांना निर्वाणप्राप्ती झाल्याचे उल्लेख आढळतात. बौद्ध धर्मात स्त्री आणि पुरुष हा भेद नाही कारण वृद्धत्व, आजार आणि मृत्यू या गोष्टी स्त्री-पुरुष, सामाजिक प्रतिष्ठा, वय इत्यादींवर अवलंबून नसतात. अर्थात दुःख आणि अनित्यता या दोन्ही गोष्टी प्रत्येकासच लागू असतात.



**बौद्ध भिक्खुणी**

सुरुवातीच्या बौद्ध ग्रंथांमध्ये जरी स्त्रियांना निर्वाणप्राप्ती होऊ शकते, हे मान्य केलेले असले तरी ‘विनय पिटक’ या ग्रंथात मात्र भविष्यात स्त्री-बुद्ध होण्याची शक्यता स्पष्टपणे नाकारलेली आहे. स्त्रियांनी दीक्षा घेऊन भिक्खुणी म्हणून बौद्ध धर्मसंघात प्रवेश करण्यास मात्र प्रतिबंध नव्हता. गौतम बुद्धांनी मुलीचा जन्म हा चिंताजनक किंवा निराशाजनक समजू नये, असे म्हटलेले आहे.

गौतम बुद्धांनी स्त्रियांच्या समाजोपयोगी भूमिकेला महत्त्व दिले. पती जर काही कारणाने अकार्यक्षम झाला असेल तर स्त्रिया घरातील कर्त्या व्यक्तीची भूमिका बजावतात. वास्तविक पाहता तिला पतीच्या व्यवसायाविषयीची माहिती असणे आणि त्याच्या अनुपस्थितीत तिला तो सांभाळता येणे अपेक्षित असे. गौतम बुद्धांना स्त्रियांच्या व्यवहारक्षमतेची जाणीव होती आणि म्हणून त्यांनी स्त्रियांना भिक्खुणी संघातील अनेक जबाबदाऱ्या वाटून दिल्या होत्या. अनेक नावाजलेल्या भिक्खुणी होऊन गेल्या. त्यांमध्ये धम्मदिन्ना, खेमा

आणि उप्पलवन्ना ही काही नावे उदाहरणादाखल देता येतील.

मध्ययुगामध्ये भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान अधिक घसरणीला लागले. मध्य आशियातून आलेल्या टोळ्यांची आक्रमणे आणि पुरोहित वर्गाच्या वर्चस्वाखालील समाजव्यवस्थेत काटेकोरपणे राबवले जाणारे कडक नियम हे मुख्यतः या घसरणीला कारणीभूत होते. स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अनेक निर्बंध लादले गेले, त्यांना धर्मग्रंथांचे शिक्षण मिळणे बंद झाले, लिहायला-वाचायला शिकवणे बंद झाले आणि तिला जन्मभर पुरुषांवर अवलंबून राहणे भाग पडू लागले. राजघराण्यातील आणि क्वचित उच्चवर्णीय स्त्रियांना मात्र खासगीमध्ये लिहिण्यावाचण्याचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली जाई.

वैदिक काळामध्ये विधवा पुनर्विवाहाला मान्यता होती परंतु मध्ययुगामध्ये ते पूर्णतः निषिद्ध मानले गेले. स्त्रियांना कुटुंबाच्या संपत्तीमध्ये वाटा नाकारण्याची परंपरा याही काळात तशीच राहिली. बालविवाह, सती, पडदापद्धत आणि देवदासी परंपरा यांसारख्या गोष्टींमुळे स्त्रियांचे शोषण होत राहिले. पितृप्रधान पद्धतीवर आधारलेली एकत्र कुटुंबपद्धती, बहुपत्नीकत्व आणि बालविवाह- अशा प्रथांमुळे स्त्रियांच्या व्यक्तीविकासाच्या वाटा बंद झाल्या.

**(iii) शिक्षणपद्धती :** हडप्पा संस्कृतीच्या मुद्रांवरील लेखांच्या आधारे हे स्पष्ट होते की या संस्कृतीचे लोक लिपीचा वापर करत होते. घरगुती वापराच्या काही वस्तूंवरही हडप्पा लिपीतील लेख मिळालेले आहेत.

वैदिक काळात वैदिक ग्रंथांचे अध्ययन-अध्यापन केले जाई. वैदिक साहित्य हे संस्कृतमध्ये होते. मात्र संस्कृत ही लोकभाषा नव्हती. यजुर्वेदामध्ये स्त्रियांसह सर्व वर्गातील व्यक्तींचा शिक्षणाचा हक्क मान्य केलेला आहे. अथर्ववेदामध्येही प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा हक्क असल्याचे म्हटले आहे. वैदिक शिक्षणासाठी गुरूकुलात प्रवेश करण्यापूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णातील विद्यार्थ्यांवर उपनयनाचा संस्कार होणे आवश्यक असे. जोपर्यंत त्यांचे वास्तव्य गुरुगृही असे, तोपर्यंत त्यांना ब्रह्मचर्याचे पालन करावे लागे. मौखिक पठणाच्या पद्धतीने विद्यार्थी वेदांमधील ज्ञान मुखोद्गत करत असत. मौखिक पठणाच्या या पद्धतीत शुद्ध आणि स्पष्ट उच्चारणावर पूर्ण भर दिलेला असे. तल्लख बुद्धी आणि व्यक्तिमत्व यांचा विकास, ही या शिक्षणाची दुहेरी उद्दिष्टे होती. बहुतेक अभ्यासकांच्या मते वैदिक काळात लेखनकला माहीत नव्हती. सत्यावर आधारलेले आचरण, विहित कर्तव्याचे पालन (धर्म) गुरू आणि माता-पिता यांच्याप्रती निष्ठा, अतिथीसेवा, श्रद्धा आणि औदार्य या गुणांना महत्त्व होते. क्षत्रिय प्रशासन आणि युद्धनीतीचे शिक्षण घेत. वैश्य उद्योग -व्यवसायास उपयोगी शिक्षण घेत. शूद्र शेती आणि पशुपालनाचे शिक्षण घेत. ब्राह्मण बहुधा चारी वेदांवर प्रभुत्व मिळवेपर्यंत गुरुगृहीच राहत असत. वेदकाळात ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन आणि पुढील पिढ्यांकडे ज्ञानाचे हस्तांतरण करण्याचे काम ऋषी, मुनी आणि द्रष्ट्या व्यक्तींनी केले. ब्रह्मतत्वाचे ज्ञान प्राप्त झालेले म्हणून त्यांना 'ब्राह्मण' म्हणत.

उत्तर वैदिक काळात स्त्रियांनी वेदांचे शिक्षण घेण्यावर निर्बंध घालण्यात आले. यज्ञसंस्थेला अत्यंत महत्त्व प्राप्त झाल्यामुळे त्यासंबंधीचे साहित्य या काळात मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले. साहजिकच यज्ञसंस्था हा या काळातील वैदिक शिक्षणाचा केंद्रबिंदू होता. इसवीसनापूर्वीच्या पहिल्या सहस्रकात भारतातील पहिल्या जनपदांचा उदय झाला आणि नंतरच्या काळात या जनपदांच्या विस्तारवादी धोरणांमुळे जनपदांमध्ये सत्तासंघर्षाचा काळ निर्माण झाला. जनपदांचे विघटन, जनपदांच्या अनेक प्रमुखांना सत्ता गमवावी लागणे यांसारख्या गोष्टींमुळे असुरक्षितता निर्माण झाली. त्यातून निर्माण झालेल्या निराशाजनक वातावरणातून मोक्षप्राप्तीसाठी विरक्तीवर आधारलेला तापसी जीवनाचा मार्ग अनेकांनी अवलंबला असावा. हा मार्ग वेदकाळातही माहीत असला तरी उपनिषदांमध्ये त्याची सखोल चर्चा केलेली आढळते. इथे हे नमूद करायला हवे की उपनिषदांच्या काळापर्यंत (इसवीसनापूर्वी सुमारे ६ वे शतक) तपस्वी व्यक्तींनी केलेल्या उपदेशातून तसेच उपनिषदांवरील चर्चा आणि खंडनमंडनाच्याद्वारे या मार्गाचा प्रसार झाला होता. या चर्चांच्या आधारे तात्त्विक शक्यतांचा विचार सुरू झाला आणि भारताच्या पूर्वेकडील प्रदेशांमधून यज्ञापेक्षा मानवी कल्याणावर भर

देणाऱ्या आणि ईश्वराच्या अस्तित्वाचा विचार करणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या प्रणाली उदयाला आल्या. 'श्रमण' आणि 'परिव्राजक' यांसारखे आध्यात्मिक नेतृत्व करणारे पंथ अस्तित्वात आले. या नव्या पंथांनी वेदप्रामाण्य आणि वैदिक पुरोहितांचे वर्चस्व अमान्य केले. मात्र आत्म्याचे चिरंतन अस्तित्व आणि पुनर्जन्म तसेच कर्मसिद्धान्त त्यांना मान्य होता. यज्ञविधींचा अविभाज्य भाग असलेला पशुबळी त्यांना अमान्य होता. अहिंसा किंवा प्राणीमात्रांना इजा न करणे या गोष्टीला त्यांनी प्राधान्य दिले. तुमच्या लक्षात आले असेलच की इथे प्राचीन भारतातील अनेक ठिकाणी भ्रमण करून जनसामान्यांना उपदेश करणाऱ्या वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा निर्देश अभिप्रेत आहे.

वर्धमान महावीरांना 'केवलिन' (सर्वज्ञ) पदाची प्राप्ती झाल्यानंतर ते 'महावीर' आणि 'जिन' म्हणून ओळखले जाऊ लागले. ते 'निर्ग्रंथ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संप्रदायाचा भाग झाले. कालांतराने याच संप्रदायाला 'जैन' या नावाने संबोधण्यात येऊ लागले. जैन म्हणजे 'जिन' म्हणजेच वर्धमान महावीरांचे अनुयायी. त्यांनी जैन धर्माच्या उपदेशासाठी तीन दशके भ्रमण केले. त्यांच्या आणि गौतम बुद्धांच्या उपदेशामध्ये काही फरक होते. गौतम बुद्धांची तत्त्वप्रणाली त्यांच्या प्रदेशातील स्थानिक श्रद्धाप्रणालीतील मूलभूत तत्त्वांशी नाते सांगणारी होती. उदाहरणार्थ, तत्कालीन 'चैत्य' हे पृथ्वीतत्त्व आणि भूतमात्रांची स्थानके असल्याचे मानले जाई. सामान्यजनांसाठी ती विनासायास आणि विनामूल्य प्रवेश असणारी पूजास्थाने होती. सनातनी समाजाबाहेरील साधू या चैत्यांभोवतीच्या प्रदेशात वास्तव्य करत असत. या चैत्यांच्या पूजेसाठी येणाऱ्या लोकांकडून त्यांना भिक्षा मिळत असे. गौतम-बुद्धांनी ही प्रचलित प्रथेला मान देऊन आपल्या जनसामान्यांमधील अनुयायांनाही तसे करण्यास प्रवृत्त केले. कालांतराने भारतात अनेक ठिकाणी बौद्ध संघ स्थापन झाले. सतत भ्रमण करणाऱ्या भिक्खूंना पावसाळ्यात राहण्यासाठी ठिकठिकाणी 'वर्षावास' बांधले गेले. भिक्खूंच्या वास्तव्यासाठी बांधलेल्या या स्थानांना 'विहार' असे म्हणत. या विहारांमधून पुढे बौद्ध भिक्खूंना शिक्षण देणारी केंद्रे उभी राहिली. बौद्ध शिक्षणपद्धती ही बौद्ध संघांच्या व्यवस्थेशी बांधलेली होती. काही काळाने गौतम बुद्धांनी या संघांमध्ये स्त्रियांना प्रवेश देण्यास परवानगी दिली होती. दीक्षा घेऊन संघात प्रवेश करणाऱ्या स्त्रियांना 'भिक्खुणी' म्हटले जाई. संघात प्रवेश घेतल्यानंतर व्यक्तीची जात आणि इतर सामाजिक ओळख पूर्णतः पुसली जात असे आणि ती व्यक्ती समता आणि बंधुता या तत्त्वांवर आधारलेल्या बौद्ध संघाची सदस्य होत असे. विहारामध्ये त्यांना धार्मिक शिक्षण देण्याची व्यवस्था असे.

वैदिक गुरूकुलाप्रमाणेच बौद्ध संघातील गुरू-शिष्यांमध्ये निकटच्या सहवासामुळे एक ऋणानुबंध निर्माण होत असे. शिष्याला गुरूजवळ ('उपाझ्झाय' अथवा 'आचार्य') राहून त्यांची सेवा करावी लागे. भिक्खू आणि भिक्खुणी यांचे संघ स्वतंत्र असत. भिक्खुणी संघांमध्ये गुरूपदी पोचलेल्या अनेक ज्ञानी भिक्खुणी होऊन गेल्या. त्यांचा उल्लेख आदराने 'थेरी' असा केला जाई. भिक्खुणी संघांमध्ये शिक्षण आणि सेवाभाव यांसाठी अनेक संधी उपलब्ध होत्या. गौतम बुद्धांची शिकवण म्हणजे ज्याला आज आपण 'मानवतावाद' म्हणू शकू अशा तत्त्वज्ञानाचा पाया होती. तुम्हाला नालंदा आणि तक्षशिला येथील विद्यापीठासंबंधी माहिती असेलच. तेथील विहारांमधून बौद्ध धर्म आणि साहित्य यांचे अध्ययन-अध्यापन केले जाई. अध्ययन-अध्यापन करण्याची ही परंपरा बौद्ध विहारांमधून आजतागायत जपलेली आहे. बौद्ध शिक्षणपद्धतीचा इतिहास हा पर्यायाने बौद्ध संघ आणि विहार यांचाही इतिहास आहे. ज्याप्रमाणे वैदिक परंपरेतील शिक्षणपद्धती यज्ञसंस्थेभोवती गुंफलेली होती, त्याचप्रमाणे बौद्ध परंपरेतील शिक्षणपद्धती बौद्ध संघ आणि विहार यांच्याभोवती गुंफली गेली होती. ह्युएन त्संग या चिनी भिक्खूच्या प्रवास वर्णनांमध्ये या गोष्टीचा उल्लेख आहे.

'संघम' काळातील शिक्षण व्यापक होते. ते धर्म, जात या गोष्टींवर अवलंबून नव्हते. तसेच ते एखाद्याच समाजाची मिरासदारीही नव्हते. व्याकरण, काव्य, गणित, खगोलशास्त्र आणि ललित कला (संगीत, नृत्य नाट्य, चित्रकला, शिल्प) आणि स्थापत्य हे अभ्यासाचे खास विषय होते.

बौद्ध विहारांचा उतरणीचा काळ हा एक सुव्यवस्थित शिक्षणपद्धतीच्या ऱ्हासाची सुरुवातही दर्शवतो. याच काळात भारतात इस्लामचे आगमन झाले. हा काळ भारतातील मध्ययुगाच्या सुरुवातीचा काळ होता.

मध्ययुगातील शिक्षणपद्धतीमध्ये इस्लामच्या शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले. असे असले तरी समाजात मोठ्या प्रमाणावर असलेल्या निरक्षरतेमुळे कुराण, हदिथ आणि इतर संबंधित शास्त्रांचे अध्ययन-अध्यापन कठीण होते. पैगंबर मुहम्मद यांनी इस्लामच्या सर्व अनुयायांनी ज्ञान मिळवायला हवे, असा आदेश दिला. परंतु त्यासाठी भारतातील पूर्वीच्या शिक्षणपद्धतींमधील कडक शिस्त किंवा सर्वसंगपरित्याग या गोष्टी आवश्यक मानलेल्या नव्हत्या. इस्लामिक शिक्षणपद्धतीमध्ये इस्लामवर श्रद्धा असणाऱ्या सर्व वर्गातील व्यक्तींना प्रवेश होता.

भारतातील मध्ययुगीन इस्लाामिक शिक्षणाशी निगडित असलेल्या तीन मूलभूत संस्था :

(१) **मक्ताब** : मशिदीशी संलग्न असणारी प्राथमिक शिक्षण देणारी संस्था

(२) **मदरसा** : मशिदीशी संलग्न असणारी उच्च शिक्षण देणारी संस्था

(३) **खानक्वा** : 'अल्लाह' विषयीच्या परमोच्च तत्त्वांचे शिक्षण देणारी सुफी केंद्रे

**मक्ताब**मध्ये साधारणपणे वयाच्या चौथ्या वर्षी प्रवेश दिला जाई. त्यासाठी एक धार्मिक विधी करावा लागे. या टप्प्यावर वाचन, पठण, लेखन आणि अंकगणित या विषयांच्या अध्ययनावर भर दिला जाई. लिपी आणि लेखन यांच्या अध्ययनासाठी अनेक तास खर्ची घातले जात. वयाच्या साधारण सातव्या वर्षी कुराणच्या अध्ययनास सुरुवात होत असे.

**मदरसा**मध्ये कुराण आणि त्याचे स्पष्टीकरण करणारे ग्रंथ यांचे वाचन आणि त्यांचा सखोल अर्थ समजावून घेणे यांवर भर असे. त्याखेरीज शेती, हिशोब, ज्योतिष, खगोलशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित, इस्लाममधील कायदेकानून आणि न्यायव्यवस्था तसेच प्रशासन यांसारखे व्यवहाराविषयक विषयही शिकवले जात. त्याचबरोबर अरेबिक आणि पर्शियन भाषाही शिकवल्या जात (तत्कालीन इस्लामी जगतात सर्वत्र या भाषा शिकवल्या जात असत). सुप्रसिद्ध विद्वान अबुल फज्ल याने नमूद केल्यानुसार अकबर बादशाह याने मदरशामध्ये शिकण्यास येणाऱ्या हिंदू विद्यार्थ्यांसाठी संस्कृत भाषा आणि उपनिषदांसारखे ग्रंथ यांच्या अध्ययनाची तजवीज केली होती. यावरून आपल्याला कल्पना येऊ शकते की त्याच्या काळात विद्यार्थ्यांच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक गरजांनुसार शिक्षण देण्याची व्यवस्था होती. विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार आणि आयुष्यातील ध्येयानुसार विषयांची निवड करू शकत होते. मदरशातील शिक्षण संपल्यानंतर खासगी शिक्षकांच्या हाताखाली शिक्षण सुरू ठेवता येत असे (उदाहरणार्थ, अब्दुल कादिर बदायूंनी, अबुल फज्ल, फैझी). मदरशामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी या दोहोंच्या राहण्याची सोय केलेली असे त्यासाठी लागणारे आर्थिक बळ राज्यसत्ता आणि मुस्लीम अमीर-उमरावांकडून मिळत असे. या दृष्टीने मदरशांची तुलना बौद्ध विहार आणि दक्षिण भारतातील मंदिरांमधील (इ.स.सातवे शतक) विद्याकेंद्रे यांच्याशी करता येईल.

**खानक्वा** नावाने उल्लेख केल्या जाणाऱ्या संस्थांची तुलना मध्ययुगीन युरोपातील ख्रिश्चन मठांशी (मोनॅस्टरी) करता येईल. खानक्वा सहसा लोकांमध्ये पूजनीय समजल्या जाणाऱ्या सुफी संतांच्या दर्ग्याशी निगडित असत.



**भारतीय इस्लामी कला**

**कृती ३**

मध्ययुगीन भारताच्या कलाक्षेत्रांतील पुढील गोष्टींवर मुस्लीम सत्तांचा काय प्रभाव पडला, याचा शोध घ्या

- चित्रकला
- स्थापत्य
- संगीत

तुम्ही घेतलेल्या शोधाचे वर्गामध्ये सादरीकरण करा.


**कला :** गुप्त साम्राज्याचा कालखंड हे भारतीय इतिहासातील सुवर्णयुग होते, असे समजले जाते. त्याचे कारण म्हणजे या काळात संगीत, चित्रकला यांसारख्या कला आणि इतर शास्त्रांमध्ये झालेली भरीव कामगिरी. विविध उद्योग-व्यवसायांमधील कौशल्ये शिकाऊ उमेदवार प्रत्यक्ष काम करता करता आत्मसात करत असत. कला आणि उद्योगव्यवसायांची भरभराट धनिक दानशूरांच्या उदार आश्रयामुळे झाली. मध्ययुगीन भारतात मुस्लीम राज्यकर्त्यांच्या आश्रयाखाली विविध कलांवर त्यांची अभिरुची कल्पना आणि निवड यांचा प्रभाव पडला. मध्ययुगामध्ये बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे शिक्षणपद्धतीवर मात्र विपरीत परिणाम झाला. दिल्ली आणि आग्रा या राजधानीच्या शहरातील मुस्लीम शासकांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी काही विशेष प्रयत्न केले नाहीत. शहरे आणि खेडी येथील विद्वान व्यक्ती व्यक्तीगत पातळीवर अध्यापनाचे कार्य करत असत. हे अध्यापन संस्कृत, अरेबिक आणि पर्शियन भाषांमधून केले जाई. अशा प्रकारे शिक्षण घेणाऱ्यांमध्ये फक्त संपन्न वर्गातील लोक आणि मुस्लीम उलेमा तसेच ब्राह्मण आणि उच्चवर्णीय जातीमधील लोक यांचा समावेश होता. मुलींचे शिक्षण हा पिता किंवा कुटुंबातील वडिलधाऱ्या पुरुषांचा व्यक्तीगत मामला असल्याचे मानले जात होते. मुस्लीम कुटुंबातील स्त्रियांना घरच्या घरी राहून खासगी शिक्षकांकडून शिकण्याची परवानगी दिली जात असे. घरी येऊन शिकवणाऱ्या शिक्षकांना मौल्यवान वस्तू भेटीदाखल दिल्या जात. अर्थातच समाजाच्या या वरच्या थरातील लोकांची संख्या अत्यंत अल्प होती. त्यामुळे मध्ययुगातील समाजात मुलींच्या शिक्षणाची एकूण स्थिती दयनीय होती, असे म्हणण्यास हरकत नाही.

**(iv) समाजजीवन :** हडप्पा संस्कृती तेथील सुनियोजित नगरे, झाकलेली गटारे, अतिरिक्त धान्याच्या साठवणीसाठी कोठारे यासाठी ओळखली जाते. मोहेंजोदडो येथील महास्नानगृह हे तेथील सामूहिक जीवनाचे एक निदर्शक आहे. हडप्पा संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननातून पुढे आलेल्या पुराव्याच्या आधारे असे दिसते की तेथील समाजात कौशल्याधारित व्यावसायिकांचे वर्ग होते. मात्र या विभागणीत उच्चनीचतेची उतरंड नव्हती. या वर्गांमध्ये गावकरी, कारागीर, व्यापारी, मासेमारी करणारे, धर्मगुरू, प्रशासक, कलाकार, विणकर इत्यादींचा समावेश होता.

संघम साहित्यामध्ये विविध जमाती आणि जातींचा उल्लेख केलेला आढळतो. त्या आधारे त्यांच्या सहअस्तित्वाची कल्पना करता येते. ब्राह्मणवर्ग हा संख्येने कमी असला तरी तमिळ संस्कृतीच्या घडणीमध्ये त्यांचे स्थान महत्त्वाचे होते. संघम काळातील पुरोहितवर्गाचे समाजावर वर्चस्व नसले तरी ते सल्लागार आणि समाजाच्या हिताचे संरक्षक म्हणून मान्यता पावत होते. पारंपरिक कथांचे गायन करत गावोगाव फिरणाऱ्या कलाकारांचा एक स्वतंत्र वर्ग होता. शिकार आणि वाटमारी करणारी 'वेडर' नावाच्या जमातीबद्दल लोकांच्या मनात भय असे. स्वतःच्या स्वतंत्र परंपरा आणि श्रद्धा जोपासणारी 'मर्राकुडी' नावाची एक युद्धकौशल्यावर निर्वाह करणारी जमात होती. त्याशिवाय मासेमारी करणारे, मिठाचे उत्पादन करणारे, विणकर, शेतकरी, मेंढपाळ, गोपालक यांसारख्या व्यावसायिकांचे स्थान महत्त्वाचे होते.


वैदिक कालखंडातील वर्णव्यवस्था समाजातील व्यावसायाधिष्ठित वर्गवारीवर आधारलेली होती. त्यामध्ये व्यवसायानुसार वर्ण बदलण्याइतकी लवचीकता होती. वैदिक कालखंडाच्या उत्तरार्धात मात्र यात बदल होत गेले आणि अधिक कडक निर्बंध असलेली 'पावित्र्य व विटाळ' या कल्पित गोष्टींवर उभारलेली जातिव्यवस्थेची उतरंड प्रस्थापित होत गेली. अन्न, पाणी यांचे प्राशन करणे, पोशाख, व्यवसाय पूजापद्धती, सामाजिक

व्यवहार, प्रवास, इत्यादी सर्व गोष्टींवर या कल्पनांचा पगडा होता.




पहिले तीन वर्ण स्वतःला उच्च म्हणवून घेऊ लागले. फक्त त्यांना उपनयन संस्काराचा अधिकार प्राप्त झाल्यामुळे त्यांना 'द्विज' म्हणजे 'दोनदा जन्म घेतलेले' (पहिला जन्म आईच्या पोटी, दुसरा जन्म उपनयनाच्या संस्कारातून) म्हणू लागले.

**आश्रमव्यवस्था :** 'द्विज' म्हणवणाऱ्या प्रत्येकाने आदर्श जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन आश्रमव्यवस्थेमध्ये केले होते. त्यामध्ये व्यक्तीच्या आयुष्याचे चार टप्प्यात म्हणजे चार आश्रमात विभाजन केले होते. ते पुढीलप्रमाणे:




हिंदू तत्वज्ञानामध्ये परमेश्वरप्राप्ती आणि मोक्षप्राप्तीचे चार मार्ग सांगितले आहेत. ते असे : ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, राजमार्ग आणि कर्ममार्ग.

वर्तमानातील हिंदूंच्या दैनंदिन जीवनात आपापल्या विचारानुसार चारांपैकी एक किंवा अधिक मार्गांचा अवलंब करण्याची मुभा आढळते. उदा., कुंभ मेळ्याबद्दल तुम्ही कदाचित वाचले असेल किंवा यूट्यूबवरील चित्रफितींमध्ये पाहिले असेल. त्यातील साधू हे तापसी जीवन जगणारे असतात.

गुप्त सत्तेचा काळ हा भारतातील अभिजात संस्कृतीचा काळ समजला जातो. या काळात भारतीय समाजाने जीवनाच्या सर्व क्षेत्रातील समृद्धी अनुभवली. ज्या गोष्टींमुळे भारतीय संस्कृतीची स्वतःची खास ओळख निर्माण झाली त्या कला, विज्ञान, राजनीती, धर्म, तत्वज्ञान, अर्थशास्त्र अशा सर्वच क्षेत्रातील विकासाचा मूलभूत पाया या काळात घातला गेला. गुप्त सम्राट पहिला चंद्रगुप्त जेव्हा गादीवर आला तेव्हा त्याने अत्यंत सामर्थ्यशाली सैन्य उभारले आणि आपापसात लढणाऱ्या नगरांना एकछत्री अंमलाखाली आणले. त्यानंतर भारतीय उपखंडामध्ये गुप्त साम्राज्याचा विस्तार झाला. गुप्त साम्राज्यातून दूरवरच्या देशांशी व्यापार चालत असे. तसेच गुप्त साम्राज्य कलानिर्मिती आणि बौद्धिक मंथनाचा केंद्रबिंदू बनले होते. याच काळात आर्यभट्टाने भूमिती, त्रिकोणमिती, विश्वोत्पत्तीशास्त्र या विषयांवर लेखन केले, तसेच एका वर्षामध्ये ३६५-३५८ दिवस असल्याचे गणित मांडले. पृथ्वी गोल असल्याचा सिद्धान्तही त्याने मांडला. वराहमिहिराने खगोलशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र यांविषयी लेखन केले. धन्वंतरीने औषधोपचारांविषयी लेखन केले. गुप्तकालीन समाजात शिक्षण आणि लेखनवाचनाला विशेष महत्व होते. केवळ उच्चवर्गातील व्यक्तींनाच नव्हे तर समाजातील प्रत्येक इच्छुक व्यक्तीला शिक्षण घेणे शक्य होते.

हळूहळू गुप्त साम्राज्याचा विस्तार एवढा वाढला की त्या विस्तीर्ण प्रदेशावर मध्यवर्ती सत्तेला नियंत्रण ठेवणे कठीण झाले आणि छोटी छोटी राज्ये स्वतंत्र होऊन साम्राज्याचे विघटन झाले. त्यामुळे इ.स.५५० च्या सुमाराला मध्य आशियातील हूण टोळ्यांना भारतावर आक्रमण करणे शक्य झाले आणि सुमारे इ.स.६५० पर्यंत गुप्तांची सत्ता उतरणीला लागली.

दुसऱ्या नागरीकरणाच्या काळात (पहा पान नं. १७) सामाजिक-राजकीय नियमांवर प्रकाश टाकणाऱ्या नीतीशास्त्र आणि धर्मशास्त्र या विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले गेले. गुन्ह्यांसाठी दिल्या जाणाऱ्या शिक्षांची तीव्रता गुन्हेगाराच्या जातीनुसार कमीजास्त होत असे. जातिव्यवस्थेमधील विषमता अधिक तीव्र होऊन शूद्रांचा दर्जा केवळ उच्चवर्णीयांना सेवा पुरवण्यापुरता मर्यादित झाला. त्यांमध्ये कारागीर, शेतमजूर, दास इत्यादींचा समावेश होता. कुटुंबातील नातेसंबंधाची वीण पूर्वीप्रमाणेच घट्ट होती परंतु पितृप्रधान कुटुंबातील पुरुषी वर्चस्व अधिकच वाढले आणि त्याबरोबरच स्त्रियांची परिस्थितीही उत्तरोत्तर अधिकाधिक वाईट होत गेली.

भारतातील मध्ययुगीन काळ हा परकीय आक्रमणांचा काळ होता. सुरुवातीचे मुस्लीम आक्रमक हे भारतातील समृद्ध साधनसंपत्तीची लूट करण्यासाठी भारतात आले. पुढे दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात मूळ भारतीय संस्कृती आणि इस्लामी संस्कृती यांचा मिलाफ घडून आला. इंडो-इस्लामी स्थापत्य, यांत्रिक साधनांचा वापर आणि हिंदु-उर्दू (हिंदुस्थानी) भाषेचा उगम ही या काळाची वैशिष्ट्ये होती. अमीर खुस्रो हा तेराव्या शतकात होऊन गेला. हिंदुस्थानी भाषेच्या तत्कालीन रूपाचा उल्लेख 'हिंदवी' असा केला आहे. दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात भारतातील अनेक हिंदू, जैन आणि बौद्ध मंदिरांची तोडफोड आणि विटंबना केली गेली.

**हे माहिती हवे!**

प्रमुखपरंपरा आणि उपपरंपरा : मिल्टन सिंगर आणि रॉबर्ट रेडफिल्ड या उत्तर भारतात काम करणाऱ्या दोन सामाजिक मानववंशशास्त्रज्ञांनी संस्कृतीच्या संदर्भातील 'प्रमुख परंपरा' आणि त्याअंतर्गत असलेल्या 'उपपरंपरा' या संकल्पना मांडल्या. त्यांच्या मते एखादी सांस्कृतिक व्यवस्था ही प्रमुख परंपरा आणि उपपरंपरा यांच्या परस्परसहयोग आणि परस्परावलंबन यांनी परिपूर्ण होत असते:

**(१) प्रमुख परंपरा** : ज्यामध्ये विज्ञान, तत्वज्ञान, ललित कला, भल्या-बुऱ्याचे चिंतन-मनन अशा सर्व पैलूंनी युक्त असलेली प्रभावशाली विचारसरणी आहे आणि इतर उपपरंपरांना सामावून घेण्याची क्षमता आहे अशी परंपरा म्हणजे प्रमुख परंपरा होय. (उदा. हिंदुस्थानी आणि कर्नाटिक संगीत)

**(२) उपपरंपरा** : उपपरंपरांमध्ये लोकधर्म, लोकसाहित्य आणि लोककला यांचा समावेश असतो.

(उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील लावणी, पोवाडा, लेझीम यांसारख्या परंपरा किंवा केरळमधील कलरीप्पय्यटु.)

दिल्लीच्या सुलतानशाहीत सरंजामी पद्धतीची अधिकारांची उतरंड होती. त्या उतरंडीचे ढोबळमानाने चार वर्ग सांगता येतील : सत्ताधारी वर्ग आणि अमीर-उमराव (सुलतान आणि त्याचे नातेवाईक, हिंदू राजे आणि मुस्लीम नवाब), धर्मगुरू (उलेमा आणि ब्राह्मण) नागरी प्रजाजन (श्रीमंत व्यापारी आणि कारागीर) आणि गावकरी (सरकारी तिजोरीत सारा जमा करणारे खेड्यातील शेतकरी). या काळातसुद्धा जातिव्यवस्था कठोरपणे पाळली जात होती.

अभ्यासकांच्या मते, बादशाह अकबराच्या पद्धतशीर प्रयत्नांमुळे भारताला एक समर्थ आणि स्थिर राजकीय प्रशासनपद्धती मिळाली. भारतात साम्राज्याचा दूरवर विस्तार करणारे महाराजे होऊन गेले. त्यांच्यापैकी काहींची राजवट कल्याणकारी होती तर काहींची जुलमी होती. काही साम्राज्यांमध्ये शांती नांदत होती तर काही भययुक्त आणि रक्तपाताने कलंकित झालेली होती. भारतातील मध्ययुग हा सर्वाधिक अंधःकाराचा काळ होता, असे अनेकदा म्हटले जाते. युरोपच्या मध्ययुगाच्या बाबतीतही हेच वास्तव होते. असे असले तरी समाजशास्त्राचे अभ्यासक या नात्याने आपल्याला हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, या अंधःकारयुगाचे परिणामस्वरूप असे काही बदल घडून आले, ज्यामुळे भारतीय समाजाचे स्वरूप बदलून गेले.

भारताच्या अंतर्गत आणि दूरवरच्या प्रदेशांशी असलेल्या व्यापाराच्या भरभराटीबरोबरच ललित कला, स्थापत्य आणि शिल्प यांचाही उत्कर्ष झाला. बादशाह अकबरने स्थापन केलेला 'दिन-इ-इलाही' हा नवीन धर्म नैतिक तर्कशुद्धतेवर आधारलेला होता.

एकोणिसाव्या शतकाकडे वाटचाल होत असताना भारतीय समाजातील विविध धर्म आणि पंथातील उदारमतवादी आणि सनातनी समूहांमधील दरी वाढत गेली. असे ध्रुवीकरण झाले यामध्ये आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. कारण भारतातील धार्मिक गटांमध्ये अशा प्रकारचे ध्रुवीकरण घडण्याचा जणू पायंडाच पडलेला दिसतो तो अगदी एकविसाव्या शतकापर्यंत.

**(v) शहरीकरण** : शहरीकरण हा औद्योगिकीकरणाचा परिणाम आहे, या आधुनिक काळातील लोकप्रिय दृष्टिकोनाला हडप्पा संस्कृतीमध्ये दिसणारे नागरीकरण छेद देणारे आहे. आधुनिक औद्योगिकीकरणाचा मागमूस नसतानाही हडप्पा

संस्कृतीमध्ये पुर्वनियोजित नगरे अस्तित्वात होती आणि तेथील जीवनप्रणालीला '**पहिली नागरी संस्कृती**' म्हणता येते. पुरातत्त्वीय पुराव्यावरून असे दिसते की हडप्पा संस्कृतीच्या लोकांचे नागरी जीवन विकसित स्वरूपाचे होते. काही घरांमधून विहिरी आणि स्नानगृहे होती. नगरामध्ये बंद आणि भूमीगत गटारे होती. सामाजिक परिस्थिती ही मेसोपोटेमिया आणि इजिप्त येथील समकालीन प्रगत नागरी संस्कृतींसारखीच प्रगत होती. सुमेरियन इष्टिकालेखांमध्ये हडप्पा संस्कृतीच्या प्रगत व्यापाराचे उल्लेख केलेले आहेत.

उत्तर वैदिक काळाच्या उत्तरार्धापर्यंत असे दिसते की पशुपालकांचे भटके जीवन जगणारे आर्य लोक पंजाबपासून पूर्वेकडे गंगा नदीच्या खोऱ्यापर्यंत पसरले होते. त्या प्रदेशात त्यांनी जंगलतोड करून तेथील जमीन लागवडीखाली आणली होती. इसवीसनापूर्वी सुमारे ५०० ते २०० वर्षे या कालखंडात या प्रदेशात '**दुसरे नागरीकरण**' झाले. या काळात अनेक शहरे उदयाला आली, जी नागरी संस्कृतीची केंद्रे बनली. हळूहळू मगध महाजनपदाच्या राजांनी या प्रदेशात प्रभुत्व प्रस्थापित केले. त्यातूनच मौर्य साम्राज्याच्या उदयाची पार्श्वभूमी तयार झाली. हा काळ पूर्व वैदिक संस्कृतीपेक्षा भिन्न वैशिष्ट्ये असलेल्या संस्कृतीचा काळ होता.

वैदिक लोकांच्या सुरुवातीच्या 'जनपद' या नावाने उल्लेख केल्या जाणाऱ्या छोट्या राज्यांनी विस्तार करण्यास प्रारंभ केला आणि विविध जनपदांच्या एकत्रीकरणातून 'महाजनपदे' निर्माण झाली. त्यातील काहींमध्ये राजेशाही सत्ता होती तर काहींमध्ये गणराज्य पद्धतीची राज्यव्यवस्था होती. या महाजनपदांनी अफगाणिस्तानपासून ते बंगालपर्यंत आणि महाराष्ट्राचा काही प्रदेश व्यापलेला होता. हडप्पा नागरी संस्कृतीनंतर या कालखंडात पुन्हा एकदा या महाजनपदांमधून नागरी जीवन उदयाला आले. याचा पुरातत्त्वीय पुरावा 'उत्तर भारतातील चकाकीदार काळी भांडी' (NBP – नॉर्दर्न ब्लॅक पॉलिश्ड् वेअर) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननांमधून मिळालेला आहे. या काळातील नगरांची आणि तेथील जनजीवनाची माहिती जैन, बौद्ध आणि संस्कृत सूत्रवाङ्मयातून मिळते.

याच काळात धातूच्या चलनी नाण्यांची सुरुवात सुरुवात झाली. महाजनपदांमधील राजधानींची नगरे ही सत्तेची आणि व्यापारी केंद्रे बनली. या नगरांमध्ये कारागीर आणि व्यापारी श्रेणी प्रस्थापित झाल्या. अंतर्गत आणि दूरवरच्या व्यापारासाठी पश्चिम आणि पूर्वेकडील प्रदेशांना जोडणाऱ्या हमरस्त्यांचे जाळे निर्माण झाले. 'राजा' या पदाला सर्वाधिक सामर्थ्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली. राज्यकारभारमध्ये राजाला साहाय्य करण्यासाठी मंत्री आणि विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाऊ लागली. बहुतांश मंत्री आणि अधिकारी हे क्षत्रिय असत.

भारतातील सामाजिक-ऐतिहासिक वाटचालीचे हे थोडक्यात केलेले कथन तुम्हांला भारतीय समाजाच्या घडणीतील विविध प्रवाह आणि घटक किंवा लोकांची विचारसरणी आणि वर्तनपद्धती यांमध्ये प्रभावी ठरणारे घटक यांची कल्पना आली असेल. आधुनिक भारतातील विद्यार्थी या नात्याने भारतातील विविध श्रद्धाप्रणाली, रीतीरिवाज, परंपरा, रूढी, त्यानुसार आजही अस्तित्वात असलेल्या पूर्वापार वर्तनपद्धती या सर्वांचे चिकित्सक विश्लेषण करणे आवश्यक आहे. निश्चितच या गोष्टी अखंडपणे टिकून राहण्यामध्ये समाजजीवनाच्या पठडीचे पिढी-दरपिढी होणारे संक्रमण महत्त्वाचे आहे. रूढीपरंपरा, रीतीरिवाज यांचे अखंडित्व का आणि कसे टिकून राहते, हे समजून घेणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. अर्थातच संमिश्र आणि गुंतागुंतीचे स्वरूप असलेल्या संस्कृतीची वैशिष्ट्ये सर्वत्र आणि सर्व काळी एकसूरी असणे शक्य नसते. उलट त्यामध्ये परस्परविरोधी आणि संघर्षमूलक कल्पना प्रचलित असणे हा त्या संस्कृतीचा अंगभूत गुणधर्म असतो. परंतु या गुणधर्मामुळे निर्माण झालेली विविधता आणि गुंतागुंत त्या संस्कृतीचे सौंदर्य वाढवणाऱ्या असतात. अशा संस्कृतींचे वास्तव समजून घेण्यासाठी एकाच सरधोपट मार्गाचा अवलंब करता येत नाही ही गोष्ट थोडी अवघड वाटली तरी ती लक्षात घेणे आवश्यक आहे. ऐतिहासिक घडामोडी आणि त्यामुळे अनेकदा निर्माण झालेली अस्थिर परिस्थिती आणि त्यातील अनेक स्तरांवरील गुंतागुंत यथार्थपणे समजून घेणारा दृष्टिकोन विकसित होणे याला 'समाजशास्त्रीय चिंतन' असे म्हणता येईल.

**तुमची प्रगती तपासून पहा**

(१) पूर्व वैदिक काळातील शिक्षणपद्धती कशी होती ?

(२) उत्तर वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांच्या घसरलेल्य सामाजिक स्थानाची दोन लक्षणे सांगा.

(३) मध्ययुगीन भारतीय समाजाची कोणतेही दोन वैशिष्ट्ये सांगा.

## १.२ वसाहतकालीन भारत

सर्वसाधारण भारतातील वसाहत काल कालखंड या भागात युरोपियन देशांनी सत्ता प्रस्थापित करण्याचा कालखंड समजला जातो.

१६ व्या शतकात व्यापाराच्या उद्देशाने पोर्तुगीज भारतात आले. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात डच आणि ब्रिटिशही भारताच्या किनाऱ्यावर उतरले. फ्रेंचसुद्धा भारतात पोचले, पण त्यांचे अस्तित्व अधिक प्रकर्षाने फक्त दक्षिण भारतात पुदुच्चेरी (पाँडिचेरी) येथे जाणवले. ब्रिटिशांनी विसाव्या शतकापर्यंत भारतावर राज्य केले. त्यांच्या राजवटीच्या काळात भारतात ख्रिश्चन धर्माच्या अँग्लिकन परंपरेचा (चर्च ऑफ इंग्लंड) प्रभाव अधिक होता.

ब्रिटिशांच्या काळात प्रशासनामध्ये अनेक संस्थात्मक सुधारणा होऊन राज्यकारभाराची घडी सुरळीत झाली तसेच अनेक सामाजिक सुधारणा होणे शक्य झाले, या गोष्टी नाकारता येणार नाहीत.

वसाहतींच्या काळातील ब्रिटिश सत्तेच्या भारतीय समाजावरील दृश्य परिणामांचा आपण थोडक्यात आढावा घेऊया.

**(१) शिक्षणपद्धती :** ब्रिटिशांनी भारतात प्रस्थापित केलेल्या शिक्षणपद्धतीचे दूरगामी परिणाम पुढीलप्रमाणे आहेत. उच्च शालेय पातळीवरील शिक्षण इंग्रजी भाषेतून दिले जाई. त्यामुळे आधुनिक शिक्षण घेतलेल्या लोकांमध्ये इंग्रजी ही संपर्क भाषा बनली. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सर्व वंश, जाती आणि धर्माच्या मुला-मुलींना प्रवेश घेण्याची मुभा होती. 'इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट - १८५६' अन्वये कलकत्ता (कोलकाता), बॉम्बे (मुंबई) आणि मद्रास (चेन्नई) येथे भारतातील पहिल्या विद्यापीठांची स्थापना झाली. आधुनिक शिक्षणपद्धतीमधील विषय आणि अभ्यासक्रम धार्मिक नव्हते ते लौकिक जीवनाशी (सेक्युलर) संबंधित होते. त्यांमध्ये गणित, विज्ञान, तत्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास यांसारख्या विषयांचा समावेश होता. या शिक्षणपद्धतीच्या मुशीतून नवीन बुद्धिवादी वर्ग उदयाला आला. या वर्गातील लोक जन्माने भारतीय परंतु पश्चिमी विद्येच्या चौकटीत घडलेले होते. त्यांच्यापैकी काहींनी समाजसुधारणेच्या कार्यात लक्षणीय काम केले. बुद्धिनिष्ठता, समानता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्ष (लौकिक) दृष्टिकोन आणि व्यक्तिवाद यांसारखी सामाजिक मूल्ये बुद्धिवादी वर्गामध्ये खोलवर रुजली.

**(२) संस्कृती :** खाद्यसंस्कृती, पेहराव, सामाजिक रीतीभाती, वर्तणुकीचे संकेत, दृष्टिकोन, विश्वासप्रणाली, भाषा, खेळ आणि मनोरंजन इत्यादी बाबतीत समाजातील सुशिक्षित वर्गातील अभिजनांनी ब्रिटीश जीवनसरणीचे अनुकरण करण्यास सुरुवात केली. प्रख्यात समाजशास्त्रज्ञ डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी ब्रिटिशांचे अनुकरण करण्याच्या या प्रक्रियेला 'वेस्टर्नायझेशन' (पाश्चात्यीकरण) असे नाव दिले. अलातास यांनी पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाचे वर्गीकरण चार प्रकारांमध्ये केले आहे - व्ययमूलक (Eliminative) बदल म्हणजे मूळ सांस्कृतिक लक्षणे हळूहळू घटत जाणे, वृद्धिमूलक (Additive) म्हणजे मूळ सांस्कृतिक लक्षणांमध्ये नवीन लक्षणांची भर पडणे, पुष्टिमूलक (Supportive) म्हणजे मूळ सांस्कृतिक लक्षणांचे अधिक समृद्ध बनणे, संमिश्रतामूलक (Synthetic) म्हणजे जुन्या-नव्याच्या एकत्रीकरणातून नवीन लक्षणे विकसित होणे.

**(३) प्रशासन :** ब्रिटिशांनी नवीन प्रशासकीय यंत्रणा उभारली आणि प्रशासनाच्या नवीन पद्धती भारतात रूढ केल्या. त्यांनी भारतीय भूमी आणि लोक यांच्यावर कारभार करण्यासाठी आर्थिक सेवा, शिक्षण सेवा, महसूल सेवा आणि प्रशासकीय सेवा यांसारख्या विविध सेवांचे विभाग स्थापन केले. हे सेवा विभाग ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या साहाय्यासाठी स्थापन केले होते. ब्रिटिशांनी नवीन न्यायपद्धत निर्माण केली. या न्यायपद्धतीमध्ये भारतातील विविध समाजांच्या पारंपरिक न्यायप्रणालींचा विचार करून या नवीन न्यायपद्धतीची

उभारणी केली होती. मात्र तिची अंमलबजावणी धर्मनिरपेक्ष पद्‌धतीने, व्यक्तीच्या जातीपातीचा विचार न करता केली जाई. वतनदार आणि जमीनदार यांचे वहिवाटीने चालत आलेले विशेष अधिकार रद्‌द करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून भारतीय लोकांच्या आणि समाजाच्या मानसिकतेमध्ये हळूहळू लोकशाही मूल्ये झिरपू लागली. 'इंडियन कौन्सिल्स्‌ ॲक्ट', 'इंडियन हायकोर्ट ॲक्ट', 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस ॲक्ट १८६१' या सर्व कायद्यांमुळे कार्यकारी, कायदेविषयक आणि न्यायविषयक प्रशासन पद्‌धतीत महत्त्वाचे बदल घडून आले.



**उच्च-न्यायालय, मुंबई**

**(४) अर्थव्यवस्था :** औद्योगिक वाढ आणि तिच्या हातात हात घालून येणारे शहरीकरण यांमुळे वसाहतींच्या काळात भारतातील अर्थव्यवस्थेत मूलभूत स्वरूपाचे बदल घडून आले. बदलती अर्थव्यवस्था आणि औद्योगिक कारखान्यांच्या संख्येमधील वाढ यांच्यामुळे जातीनुसार कौशल्ये, व्यवसाय आणि त्यावर आधारलेले सामाजिक संबंध यांची चौकट हळूहळू बदलू लागली. शिक्षण आणि उत्पन्न या निकषांवर आधारलेले नवीन सामाजिक वर्ग उदयाला येऊ लागले. जातीजातींमधील पारंपरिक विधीनिषेधांची बंधने हळूहळू गळून पडू लागली. ब्रिटिशांनी लागू केलेल्या नवीन महसूल पद्‌धतीचा खेड्यांमधून राहणाऱ्या शेतकरी वर्गावर विपरीत परिणाम झाला. या काळात शेतीचे व्यापारीकरणही होऊ लागले होते. निर्वाह अर्थव्यवस्थेची (subsistence economy) जागा नफ्यावर पोसल्या जाणाऱ्या बाजार व्यवस्थेने घेतली. त्यामुळे नगदी पिकांना महत्त्व येऊन त्याचा परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर झाला. बंगाल आणि ओडिशा येथे १८५६ साली पडलेला दुष्काळ या बदलाचा साक्षी आहे.

**(५) दळणवळण आणि संपर्क :** भारतभर रेल्वे आणि रस्ते यांची उभारणी तसेच टपाल आणि तार या सोयी सुरु केल्या गेल्या. त्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांपर्यंत आणि स्रोतांपर्यंत पोचणे सहज शक्य झाले. १८६९ मध्ये सुएझ कालवा खुला झाल्यामुळे व्यापार वाढला. त्यामुळे पूर्वी भारतातील कच्चा माल इंग्लंडला पोचवण्याचे कठीण असलेले काम सोपे झाले. वाहतूक आणि संपर्क यांच्या साधनांमधील सुधारणांमुळे भारतीय कच्च्या मालासाठी अधिक बाजारपेठा उपलब्ध झाल्या.

**(६) राष्ट्रवादाची चळवळ :** संपर्कासाठी इंग्रजी भाषेचा शिक्षितांच्या गटांमधील वाढता वापर हा राष्ट्रवादाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी फार महत्त्वाचा ठरला. त्यामुळे राष्ट्रवादाच्या चळवळीला चालना मिळाली. भारतीयांमध्ये परकीय ब्रिटिशांच्या सत्तेविरूद्‌ध निर्माण झालेल्या असंतोषाच्या भावनेमुळे ब्रिटिशांविरूद्‌ध 'चले जाव'चा पुकारा केला गेला आणि भारतीयांच्या स्वातंत्र्यलढ्याला गती मिळाली. एकोणिसाव्या शतकामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा उदय, महात्मा गांधींनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व स्वीकारणे या गोष्टी घडून आल्या.

**(७) समाजसुधारणेच्या चळवळी :** समाजातील वरच्या थरातील शिक्षित वर्गातील लोक सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या कामामध्ये अग्रभागी होते. एकोणिसाव्या शतकामध्ये सामाजिक आणि धार्मिक सुधारणेच्या अनेक चळवळी उभ्या राहिल्या (खाली दिलेली चौकट पहावी). यातील बहुतेक गट सामाजिक सुधारणांसाठी आपापल्या स्थानिक पातळीवर काम करत होते. कालबाह्य, दडपणाऱ्या आणि प्रतिगामी प्रथा नष्ट करण्यासाठी त्यांचा संघर्ष चालू होता. अनेकजण सामाजिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या व्यक्तिंना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून काम करत होते. आर्य समाजांसारख्या संघटना वैदिक परंपरांचे पुनरूज्जीवन आणि वैदिक ज्ञान आधुनिक अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट करणे यांसाठी प्रयत्न करत होत्या.

| समाजसुधारणेच्या चळवळी | संस्थापक |
|---|---|
| ब्राह्मो समाज | राजा राममोहन रॉय |
| आर्य समाज | स्वामी दयानंद सरस्वती |
| प्रार्थना समाज | आत्माराम पांडुरंग तर्खडकर |
| सत्यशोधक समाज | महात्मा जोतिबा फुले |
| हरिजन सेवक संघ | महात्मा गांधी |
| थिऑसॉफिकल सोसायटी | ॲनी बेझंट |
| सेवा सदन | बेहरामजी मलबारी |
| धर्म सभा | राधाकांत देब |
| वहाबी चळवळ | सैद वलीउल्लाह |
| सेल्फ रिस्पेक्ट मूव्हमेंट | इरोडे व्ही. रामस्वामी पेरियार |

**(८) सामाजिक कायदे :** या कायद्यांचा संबंध सामाजिक न्याय, समाजकल्याण, अपेक्षित सामाजिक सुधारणा तसेच भारतीय समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण देणे या गोष्टींशी आहे. समाजसुधारणांचा प्रयत्न करणारे गट आणि संघ यांची संख्या वाढल्यामुळे प्रचलित दुष्ट प्रथांवर बंदी आणणारे कायदे अंमलात आणण्यासाठी ब्रिटिश सरकारवर दडपण आणणे त्यांना शक्य झाले. हे लक्षात घ्यायला हवे की केवळ कायदे करून समाजपरिवर्तन साधता येत नाही. मात्र त्यामुळे अन्याय, दडपशाही, शोषण आणि अपशब्दांचा प्रयोग यांसारख्या गोष्टींना बळी पडलेल्यांसाठी त्यातून आशा निर्माण होते. अशा कायद्यांपैकी काही महत्वाचे कायदे पुढे दिलेले आहेत.

| वर्ष | कायद्याचे नाव |
|---|---|
| १८२९ | सती बंदी कायदा |
| १८४३ | इंडियन स्लेव्हरी कायदा |
| १८५० | कास्ट डिसेबिलिटी रिमुव्हल कायदा |
| १८५६ | विधवा पुनर्विवाह कायदा |
| १८७० | स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध कायदा |
| १८७२ | स्पेशल मॅरेज कायदा |
| १९२९ | बालविवाहविरोधी कायदा |

**प्रगती तपासा**

वसाहतींच्या काळाच्या संदर्भात

१. शैक्षणिक बदलांची दोन नावे लिहा.

२. अर्थव्यवस्थेशी संबंधित दोन बदलांची नावे लिहा.

३. प्रशासन व्यवस्थेतील दोन बदलांची नावे लिहा.

**कृती ४**

**चर्चा करा :**

वर्तमानकालीन भारतात आजही समाजसुधारणेच्या चळवळी सुरू आहेत.


## १.३ स्वातंत्र्योत्तर भारत

स्वातंत्र्योत्तर काळात एक स्वतंत्र देश या नात्याने भारताच्या ध्येयधोरणांमध्ये अनेक बदल झाले. आपली प्राचीन संस्कृती आणि ब्रिटिश काळ यांच्या संमिश्र परिणामातून आपले वर्तमानातील विचार, वागणूक, उद्दिष्टे, ध्येये, गरजा या गोष्टींची विशिष्ट पठडी बनलेली आहे. त्याबरोबर आपल्यापुढे नवीन आव्हाने आणि नवीन संधीसुद्धा उभ्या राहिलेल्या आहेत. आपल्याला पुढे जाण्यासाठी भारताच्या संविधानातील तत्त्वे आणि मूल्ये हे मार्गदर्शक ठरतात. अनुकूल बदल, लोकांचे कल्याण, सर्वांचा समावेश तसेच विकास ही उद्दिष्टे गाठण्यासाठी आखण्यात आलेल्या विविध सरकारी योजना यांचे साहाय्य मिळते. स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १९४७ नंतर भारताच्या घडणीत महत्वाच्या असलेल्या काही गोष्टींचा आढावा घेऊयात.

**(१) भारताचे संविधान :** ६ डिसेंबर १९४६ रोजी संविधान तयार करण्यासाठी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संविधानाचा मसुदा तयार केला गेला. विविध देशांच्या संविधानांमधील तत्त्वांवरील विचारमंथनातून भारतीय संविधानाचा मसुदा तयार गेला. त्यामुळे भारतीय संविधानाचे स्वरूप एका समावेशक दस्तावेजाचे आहे. त्यामध्ये भारतातील वैविध्यतेचा आदर केलेला आहे. भारताचे संविधान उदारता, समानता

आणि बंधुता या मूल्यांची जोपासना करते. भारतीय संविधानामध्ये सर्वधर्मसमभाव किंवा धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांचा आदर करणे या मूल्याला अत्यंत महत्त्व आहे. भारतीय संविधानामध्ये वेळोवेळी काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या गेल्या. नुकतीच केली गेलेली सुधारणा म्हणजे ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीर प्रांताला दिलेला विशेष दर्जा देणारे 'कलम ३७०' रद्द केले गेले, ही होय.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**




भारताच्या संविधानाचा मसुदा तयार करताना मसुदा समितीने अनेक संदर्भ विचारात घेतले. त्यामध्ये 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट - १९३५' तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन, कॅनडा, आयर्लंड, दक्षिण आफ्रिका, सोव्हिएत रशिया आणि जर्मनी (वायमर-जर्मनीचे जुने नाव) या देशांच्या संविधानांचा समावेश होता.


**(२) कायदे :** शैक्षणिक संशोधन, शास्त्रीय अभ्यास, प्रसारमाध्यमे, आंदोलक गट आणि विशिष्ट विषय घेऊन त्या संबंधात प्रत्यक्ष काम करणारे गट अशा माध्यमातून मिळालेल्या माहितीद्वारे चिंतेचे विविध विषय आणि लोकांच्या समस्या अधोरेखित केल्या जातात. त्या संबंधातील आवश्यक कायदे संसदेमध्ये पारित केले जातात. नागरी आणि गुन्हेगारी बाबींच्या नियंत्रणासाठी अनेक कायदे केलेले आहेत. कालानुरूप आवश्यकता लक्षात घेऊन वेळोवेळी कायद्यांमध्ये सुधारणा केल्या जातात किंवा कालबाह्य कायदे रद्दही केले जातात. आपल्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले काही सामाजिक कायदे खालील चौकटीत दिले आहेत.

| वर्ष | कायदेविषयक तरतुदी |
|---|---|
| १९५४ | स्पेशल मॅरेज कायदा |
| १९५५ | हिंदू कोड बिल |
| १९५५ | अनटचेबिलिटी (आफेन्सेस) कायदा. १९७६ मध्ये या कायद्याचे नाव बदलून 'प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स' (PCR Act) असे करण्यात आले. |
| १९५६ | द सप्रेशन ऑफ इम्मॉरल ट्रॅफिक इन वुमेन ॲन्ड गर्ल्स कायदा (SITA) |
| १९६१ | हुंडा प्रतिबंधक कायदा |
| १९७१ | मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी (MTP) |
| १९८५ | नार्कोटिक ड्रग्ज ॲन्ड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस कायदा |
| १९८६ | चाईल्ड लेबर (प्रोहिबिशन ॲन्ड रेग्युलेशन) कायदा |
| १९९५ | पर्सन्स वुईथ डिसेबिलिटिज (इक्वल अपॉर्च्युनिटिज, प्रोटेक्शन ऑफ राइट्स ॲन्ड फुल पार्टिसिपेशन) कायदा |
| २००५ | प्रोटेक्शन ऑफ वुमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स कायदा |
| २०१२ | प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सेस (POCSO) कायदा. या कायद्यामध्ये २०१९ मध्ये सुधारणा करण्यात आली. |
| २०१३ | प्रोहिबिशन ऑफ एम्प्लॉयमेंट ॲज मॅन्युअल स्कॅव्हेन्जर्स ॲन्ड देयर रिहॅबिलिटेशन कायदा |
| २०१५ | ज्युवेनाइल जस्टिस (केअर ॲन्ड प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन) कायदा |
| २०१९ | ट्रान्सजेन्डर पर्सन्स् (प्रोटेक्शन ऑफ राइट्स) कायदा |

**(३) अर्थव्यवस्था :** भारताच्या आर्थिक विकासासाठी १९५१ ते २०१७ या कालावधीत विविध पंचवार्षिक योजना राबवण्यात आल्या. प्रत्येक पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे स्वतंत्र होती. राजकीय यंत्रणा आणि अर्थव्यवस्था या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. त्यांच्यातील अन्योन्य संबंध समजून घेणे आवश्यक असते. अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील निर्णय सरकारी ध्येयधोरणांशी सुसंगत असतात. ज्या काळात आपल्यावर समाजवादी विचारसरणीचा पगडा होता त्या काळात सरकारने शिक्षण आणि आरोग्य यांबाबतची

जबाबदारी स्वतःच्या अखत्यारीत घेतली होती. १९९१ मध्ये जागतिकीकरणाची (काहींच्या मते जागतिकीकरणाच्या रेट्याची) आणि त्या अनुषंगाने काही बदलांची सुरुवात झाली. जागतिकीकरणाचे काही सकारात्मक पैलू निश्चितच आहेत. परंतु त्याच्या नकारात्मक पैलूंकडे लक्ष वेधणारी टीकाही करण्यात आली आहे. २०१४ सालापासून चलनबंदी, वस्तू आणि सेवा कर (GST) कायद्यादवारे अंमलात असणारी समान करप्रणाली, विविध जनकल्याण योजना, सीमारहित व्यापार, स्वच्छ भारत मोहीम, उद्योजकांना प्रोत्साहन यांसारख्या गोष्टी अर्थव्यवस्थेच्या नियोजनात कळीच्या ठरल्या आहेत.

**(४) शिक्षण :** अंगणवाडी, शाळा, विद्यापीठे, मानद विद्यापीठे, स्वायत्त संस्था, आय.आय. टी., आय. आय. एम., व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था, मुक्त शिक्षणाच्या संस्था, इत्यादींचा विचार करता शिक्षणाच्या सर्वस्तरांवरील शैक्षणिक संस्थांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली दिसते. त्यामध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्याही प्रमाणाबाहेर वाढलेली आहे. वेळोवेळी काही विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याची लाट आल्याचे दिसते. शिक्षकांच्या संख्येतही वाढ झालेली आहे. असे असूनही शिक्षणाच्या संदर्भातील आव्हाने आणि समस्या मात्र संपलेल्या दिसत नाहीत. नुकतेच, २०२० मध्ये शिक्षणपद्धतीत सर्वच स्तरावर परिवर्तन घडवून आणण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातील मसुदा तयार करण्यात आला.




**(५) राजकीय यंत्रणा :** स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये लोकशाहीच्या तत्त्वांचे अनुसरण करणारी राजकीय यंत्रणा आपण स्वीकारली. भारत हा लोकप्रिय लोकशाही देश आहे. येथील सरकारचा कारभार चालवण्यासाठी कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायव्यवस्था असे तीन प्रमुख आधार आहेत. आपण लोकशाही पद्धतीवर आधारलेले सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्व स्वीकारलेले आहे. भारतीय लोकशाहीमध्ये पूर्वी अस्तित्वात असलेल्या संस्थानांमधील नवाब, राजेरजवाड्यांच्या अधिकारांना मान्यता नाही. कायद्याच्या दृष्टीने सर्व नागरिकांचा दर्जा समान आहे. भारताने मुक्त आणि न्याय्य निवडणुकांचे तंत्र स्वीकारलेले आहे. १८ वर्षांवरील प्रत्येक भारतीय नागरिकास मतदानाचा हक्क देण्याात आलेला आहे. भारतामध्ये बहुपक्षीय पद्धत प्रचलित आहे. राष्ट्रीय राज्य पातळवरील किंवा प्रादेशिक पक्षांना मान्यता मिळू शकते. अपक्ष राहून व्यक्तिगतरित्याही निवडणूक लढवता येते. आपली राज्यव्यवस्था संघराज्य - केंद्र आणि राज्यसंघराज्याच्या अधीन असलेला प्रदेश - स्वरूपाची आहे. केंद्र सरकार किंवा राज्य सरकारची ध्येये, धोरणे आणि राजकीय हेतू हे स्वतंत्र असतात. त्यांचे आपापले मतभेद किंवा भिन्न दृष्टिकोन असू शकतात (उदाहरणार्थ, उजवी, डावी किंवा मध्यम विचारसरणी). विरोधी पक्षांची सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवणे, ही जबाबदारी असते. सहमती ही लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचे मूल्य आहे.



भारतातील प्रत्येक सज्ञान व्यक्तीला मतदानाचा हक्क

भारतीय समाजाचा परिचय करून देणाऱ्या या पाठात तुम्हांला आपल्या अत्यंत व्यापक स्वरूपाच्या संस्कृतीची आणि ती घडवण्यास कारणीभूत असणाऱ्या विविध प्रभावी घटक यांची सारांशाने परंतु यथार्थ ओळख झाली आहे असे म्हणता येईल. त्यातून आपल्या सामाजिक संस्थांचे स्वरूप समजावून घेणे शक्य होईल

तसेच भारतातील सामाजिक बदलांचा चिकित्सक अभ्यास करता येईल आणि प्रगती, विकास साधण्याच्या मार्गात आपल्या अनुभवाला येणाऱ्या अडचणी तपासून पाहण्याची क्षमता आपल्याला प्राप्त होईल. त्याचप्रमाणे आपल्यापुढे असणाऱ्या आव्हानांचीही कल्पना येईल.

## सारांश

- अभ्यासक्रमातील या घटकाद्वारे समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या उपविषयांच्या आधारे विविध कालखडांच्या इतिहासाचा परिचय करून दिला आहे. भारताचा ऐतिहासिक काळ प्राचीन, मध्ययुगीन कालखंड आणि वसाहतींचा काळ, स्वातंत्र्योत्तर काळ असा विभागलेला आहे.
- ज्या उपमुद्द्यांचा विचार केलेला आहे ते पुढीलप्रमाणे : धार्मिक प्रणालींचा प्रभाव, रूढी आणि प्रथा, भारतातील स्त्रियांचे सामाजिक स्थान आणि शिक्षणपद्धती.
- भारतीय परंपरेतील या तीनही प्राचीन धर्मांचा प्रभाव उत्तर वैदिक काळाच्या अखेरपर्यंत खूप मोठा होता. – हिंदू, जैन आणि बौद्ध प्रभाव.
- नंतरच्या काळात ज्यू, ख्रिश्चन, इस्लाम, शीख आणि पारशी या धर्मांचा प्रभाव अनेक क्षेत्रांमध्ये, विशेषतः शिक्षण, आरोग्यसेवा आणि सामाजिक देणग्या यांमध्ये दिसतो.
- मध्ययुगीन काळात भारतामध्ये अनेक हिंदू आणि मुस्लीम सत्तांचा उदय आणि ऱ्हास झाला.
- भारतामध्ये पोर्तुगीज, डच, आणि फ्रेंच असे इतर युरोपियन येऊन गेले तरी भारतीय समाजावर ब्रिटिश संस्कृतीचा प्रभाव प्रकर्षाने पडल्याचे दिसते. हा प्रभाव प्रशासन, सामाजिक कायदे, शिक्षण, दळणवळण आणि संपर्क सामाजिक सुधारणांच्या चळवळी राष्ट्रवादाच्या चळवळीचा प्रसार यांमध्ये आढळतो.
- स्वातंत्र्योत्तर काळात संविधान, कायदेव्यवस्था, शिक्षण, आर्थिक आणि राजकीय बदल तसेच सुधारणा यांचा प्रभाव दिसतो.

## स्वाध्याय

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

(१) दीक्षा घेऊन बौद्ध विहारांमध्ये राहणाऱ्या पुरुषांना .... म्हणत असत.
(भिक्खू, भिक्खुणी, ऋषी)

(२) 'स्पेशल मॅरेज ॲक्ट' .... या वर्षी पारित करण्यात आला.
(१९५०, १९५२, १९५४)

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरूस्त करून लिहा.**

(१) i) राजमार्ग – हिंदू धर्म
ii) तीर्थंकर – जैन धर्म
iii) सेंट थॉमस – शीख धर्म
iv) अष्टांग मार्ग – बौद्ध धर्म

(क) **प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| |
|---|
| **ब्राह्मो समाज, डॉ.बी. आर. आंबेडकर, हरिजन सेवक संघ** |

(१) राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेली संघटना

(२) भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष

(ड) **अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

(१) मध्ययुगीन काळात खानक्वा या धार्मिक स्वरूपाच्या संस्थांमध्ये प्राथमिक शिक्षण दिले जाई.

(२) थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन करण्यात महात्मा गांधींचा पुढाकार होता.

**प्रश्न २ टीपा लिहा.**

(१) पूर्व वैदिक काळातील शिक्षणव्यवस्था

(२) मध्ययुगीन काळातील भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान

**प्रश्न ३ फरक स्पष्ट करा.**

(१) पूर्व वैदिक काळातील आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती


(२) प्राचीन काळातील आणि वसाहतींच्या काळातील भारतीय शिक्षणपद्धती

**प्रश्न ४ खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

(१) वर्ण

(२) सामाजिक कायदे

**प्रश्न ५ (अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




(ब) **खालील विधान चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

(१) वसाहतवाद्यांच्या कायद्यांचा भारतीय समाजावर लक्षणीय प्रभाव पडला.

(२) बौद्धधर्म हा भारत व भारताबाहेरील अनेक भागांमध्ये पसरला गेला.

**प्रश्न ६ आपले मत नोंदवा.**

(१) जैन आणि बौद्ध धर्मांमुळे लोकांमध्ये आशा निर्माण झाली.

(२) समाजसुधारणेच्या चळवळी २१ व्या शतकातही सुरू आहेत.

**प्रश्न ७ पुढील प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. (कमीत-कमी १५० शब्द)**

पुढील मुद्द्यांच्या आधारे आजचा भारतीय समाज कसा बदलत गेला आहे याची उदाहरणासहीत चर्चा करा.

(i) इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे माध्यम

(ii) मतदानासाठी असलेली वयोमर्यादा कमी होणे

(iii) सामाजिक कायदे

(iv) वाहतूक आणि संपर्क (दळणवळण)

◆ ◆ ◆